**प्रकरण १**

**भारतीय इतिहासातील विवादाचा अभ्यास**

**भारतीय आर्यांचा विवाद:-**

आर्यांचा प्रश्न हा केवळ भारताच्याच नव्हे, तर साऱ्या जगाच्या इतिहासातील एक कूट समस्या होऊन बसला आहे. आजवर अनेक विद्वानांनी आटोकाट प्रयत्न करूनही त्याची अद्याप समाधानकारक उकल होऊ शकली नाही. आर्यासंबंधी खूप मोठ्या प्रमाणावर वैदिक वाङ्मय उपलब्ध असूनसुद्धा या प्रश्नावर प्रकाश टाकण्याचे सर्व प्रयत्न आजवर विफल झाले आहेत. अनेक विद्वानांनी या विषयाला वाहून घेतले आहे आणि साऱ्या जगाला या विषयात रस आहे. अभिक आंतर्राष्ट्रीय परिषदा, परिसंवाद होऊनसुद्धा आर्य कोण, कुठले आणि केव्हा आले याबद्दल विद्वानांत एकमत नसून प्रचंड मतभेद आहेत आणि समस्या अधिकाधिक बिकट होऊ लागली आहे. मूळ हा प्रश्न भाषाशास्त्राचा, परंतु नंतर पुरातत्त्वज्ञांनीही या वादात भाग घेतला. कोणीही विद्वान या दोन्ही विद्याशाखात प्रवीण नसल्यामुळे गुंतागुंत वाढली आहे. इतकेच नव्हे, तर त्याला आता राजकीय रंग चढू लागला आहे आणि त्यामुळे कटुता वाढू लागली आहे. जर्मनीत गुस्ताव्ह कोसीना या पुरातत्त्वज्ञाने आणि भारतात ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आपल्या फायद्यासाठी आर्यांचा उपयोग करून घेतला. एका विद्वानाच्या लेखावर, त्याची मते न पटल्यामुळे त्याला कडवा हिंदुत्ववादी, ख्रिश्चनविरोधी, मुस्लीमविरोधी अशी शेलकी विशेषणे देऊन त्याची संभावना केली गेली. परिणामी हा आर्यांचा प्रश्न काही नवीन निर्णायक पुरावा उपलब्ध होईपर्यंत बासनात गुंडाळून ठेवावा असे आता विद्वानांना वाटू लागले आहे.

आर्यांचा हा प्रश्न अत्यंत अनाहूतपणे सुमारे चारशे वर्षांपूर्वी निर्माण झाला. फिलिपो सासेटी नावाचा फ्लॉरेन्स शहरातील एक इटालियन व्यापारी भारतात व्यापारासाठी १५८४ मध्ये आला. तो काही काळ गोव्यात्न राहिला. व्यापार सोडून अव्यापारेषु व्यापार त्याने केला. तिथल्या एका पंडितार्कडून तो थोडेफार संस्कृत शिकला. त्यातील अनेक शब्द त्याला येत असलेल्या लॅटिन ग्रीक भाषेतल्या शब्दांसारखे वाटले. इटलीला परत गेल्यावर त्याने तिथल्या लोकांना हे सांगितले. परंतु त्याकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही. या विषयाला खरी चालना पुढे दोनशे वर्षांनी मिळाली. १७८२ मध्ये विल्यम जोन्स नावाच्या एका ब्रिटिश विद्वानाची कलकत्ता उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्याने १७८४ मध्ये कलकत्त्यात एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. त्याला भाताचा इतिहास, संस्कृती, भाषा यात रस होता. ग्रीक, लॅटिन, पर्शियन, अरेबिक यांचाही त्याने अभ्यास केला होता. भारताचा इतिहास, संस्कृती या विषयांचा अभ्यास आणि संशोधन हे एशियाटिक सोसायटीचे मुख्य उद्दिष्ट होते. ते प्रसिद्ध करण्यासाठी त्याने 'एशियाटिक रिसर्चेस' नावाचे मुखपत्रही सुरू केले. त्याला संस्कृतची गोडी लागली. त्याने १७८९ मध्ये कालिदासाच्या 'शाकुंतल' चे इंग्रजी भाषांतर केले. ते युरोपभर गाजले. त्यामुळे प्राचीन काळी भारतात एक अत्यंत समृद्ध भाषा प्रचलित होती हे पाश्चात्त्य विद्वानांना पटले आणि युरोपमध्ये संस्कृतचा अभ्यास सुरू झाला. भगवद्गीता, हितोपदेश, गीत-गोविंद यांचीही इंग्लिशमध्ये भाषांतरे झाली. सर विल्यम जोन्स संस्कृतच्या सौंदर्याने भारावून गेला. ही भाषा ग्रीक आणि लॅटिनपेक्षासुद्धा अधिक श्रेष्ठ आहे असे त्याचे मत मत होते. होते. या भाषांमधील शब्दांचे साम्य त्याला जाणवले. या भाषांमध्ये साधर्म्य का असावे याचा शोध घेण्याचा त्याने प्रयत्न केला आणि आपला सिद्धांत मांडला. त्याच्या मते संस्कृत, ग्रीक, लॅटिन भाषा बोलणाऱ्यांचे पूर्वज हे अतिप्राचीन काळी कुठेतरी एकत्र राहात असावेत, आणि कालांतराने आर्यांच्या टोळ्यांनी निरनिराळ्या प्रदेशांत स्थलांतर केले आणि या भाषा-भगिनी निर्माण झाल्या यातून तौलनिक भाषाशास्त्र ही नवी ज्ञानशाखा निर्माण झाली. ह्या *Comparative Philology* मधून हल्लीची भाषाशास्त्र (*Linguistics)* ही विद्याशाखा उत्क्रांत झाली. विल्यम जोन्सने १७८६ मध्ये एशियाटिक सोसायटीला दिलेल्या व्याख्यानात तो म्हणतो : संस्कृत भाषा प्राचीन असून ती सुबक बांधणीची आहे. ग्रीकहून ती अधिक समृद्ध आहे व लॅटिनपेक्षा प्रवाही आहे; शिवाय दोन्हीहून अधिक संस्कारित आहे. परंतु त्यांच्याशी तिचे संबंध आहेत. तिची क्रियापदे व व्याकरण यावरून तिचे या भाषांशी असलेले अनुबंध स्पष्ट होतात. हा केवळ अपघात म्हणता येणार नाही. हे ध्यानात घेता कुणाही भाषाशास्त्रज्ञाला हे जाणवेल की, या तिन्ही भाषांचा मूळ स्रोत एकच असावा, परंतु तो आज उपलब्ध नाही. गोथिक

आणि सेल्टिक या दोन्ही भाषांच्या बाबतीतही हेच म्हणता येईल; त्यांचेही मूळ संस्कृतशी निगडित आहे आणि पर्शियन भाषाही त्याच कुळातली आहे.'

विल्यम जोन्सचे हे मत तत्कालीन विद्वानांना मान्य होते. या भाषा-भगिनींना थॉमस यंग या विद्वानाने 'इंडो-युरोपियन' असे नाव दिले. त्यामुळे एकोणिसाव्या शतकात तौलनिक भाषाशास्त्राच्या अभ्यासास चालना मिळाली. त्यात जर्मन विद्वान आघाडीवर होते. इंडो-आर्यन भाषा बोलणाऱ्या मंडळींच्या मूळ वसतिस्थानाचा शोध मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. १७६७ मध्ये जेम्स पार्सन्सने भारत, इराण आणि युरोप यामधील भाषांचे मूळ एकच असावे असे प्रतिपादन केले. आधीच्या काळात ही मूळ भाषा बोलणाऱ्या पूर्वजांचे वसतिस्थान भारतातच असावे असे बहुसंख्य विद्वानांचे मत होते. इतकेच नव्हे, तर मूळ संस्कृतीचा उगम भारतातच झाला आणि सारे ज्ञान सुरुवातीस भारतातच होते आणि तेथून ते जगभर पसरले, अशी दृढ समजूत होती. काहींची या पलीकडे मजल गेली; त्यांच्या मते ग्रीक, लॅटिन आणि ट्युटॉनिक या युरोपीय भाषा संस्कृतपासून निर्माण झालेल्या आहेत.

आर्यांच्या अभ्यासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १८०५ मध्ये कोलब्रूकने 'एशियाटिक रिसर्चेस'मध्ये प्रसिद्ध केलेला वेदांवरील लेख. रोझेन हा पंडित ऋग्वेदाच्या अभ्यासात गुंतला होता, पण त्याचे काम पुरे झाले नाही. बर्नोफ हा फ्रेंच पंडित आणि त्याचा शिष्य रोठ यांचाही ऋग्वेदाचा अभ्यास चालू होता. परंतु हे संशोधन पूर्णत्वास नेले ते मॅक्समुल्लर या पंडिताने. तो जन्माने जर्मन होता, परंतु त्याची सारी हयात इंग्लंडमध्ये गेली. भाषांच्या अभ्यासात त्याला विशेष रुची होती. पुढे तो संस्कृतकडे आकर्षित झाला. बर्नोफची वेदांवरील व्याख्याने ऐकण्यासाठी तो फ्रान्समध्ये गेला बर्नोफने त्याला ऋग्वेदावर आपले ध्यान केंद्रित करण्यास सांगितले. त्यासाठी त्याने त्याला ऋग्वेदाची हस्तलिखिते पुरवली. त्याच्या नकला मॅक्स-मुल्लरने केल्या. ऋग्वेद प्रसिद्ध करण्यासाठी तो इंग्लंडला आला. आर्थिक साहाय्यासाठी त्याला अनेकांचे उंबरठे झिजवावे लागले. शेवटी ईस्ट इंडिया कंपनीने त्याला मदत केली आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्याने संपादित केलेला ऋग्वेद प्रसिद्ध केला. त्यात तो स्वतःला पंडित मोक्ष-मुल्लर म्हणवितो. ग्रंथात आलेल्या 'आर्य' या शब्दावरून त्याने इंडो-आर्यन हे नाव संस्कृत आणि तद्भन्य भारतीय भाषांना दिले. 'आर्य' या भाषावाचक संज्ञेचा उपयोग जर्मन लोकांनी वंशवाचक करून त्याचा राजकारणात उपयोग करून घेतला. एकोणिसाव्या शतकात संस्कृतच्या अभ्यासात भाषाशास्त्रज्ञ प्रामुख्याने होते. पुढे विसाव्या शतकाच्या सुरुवातीस काही अत्यंत महत्त्वाच्या पुरात्तत्त्वीय शोधामुळे पुरातत्त्वज्ञांनी या विषयात रस घेतला. ह्युगो विंकलर या जर्मन पुरातत्त्वज्ञाला तो करीत असलेल्या बोधाजकोई (तुर्कस्तान) येथील उत्खननात एक मोठा शिलालेख सापडला. त्यात तेथील हिटाईट आणि मिटानी या दोन टोळ्यांतील तहाच्या अटी नोंदवून ठेवल्या होत्या. त्याच्या सुरुवातीस त्यांनी त्यांच्या देवतांना आवाहन केलेले होते. त्यांची इंद्र, वरुण, मित्र आणि नासत्य अशी नावे होती. याच देवांची नावे ऋग्वेदातही आढळतात. या शिलालेखाचा काळ इ.पू. १३६० असा निश्चित केला गेला आहे. लेखाच्या पुराव्यावरून इंडो-आर्यन बोलणारे लोक इ.पू. चौदाव्या शतकात तुर्कस्तानात होते हे सिद्ध झाले. त्यावरून भारतात येण्यापूर्वी इंडो-आर्यन तुर्कस्तानात होते असा तर्क केला गेला.

दुसरा महत्त्वाचा पुरातत्त्वीय शोध सिंधु संस्कृतीचा. १९२१-१९२२ मध्ये हडप्पा आणि मोहोंजोदारो येथील उत्खननात ही भारतातील अति प्राचीन संस्कृती अचानक उजेडात आली. त्यामुळे भारतात पाच हजार वर्षांपूर्वी इजिप्त आणि मेसोपोटेमियातील संस्कृतीइतकीच प्राचीन, परंतु काही बाबतींत त्याहूनही प्रगत अशी नागरी संस्कृती भारतात नांदत होती, हे सिद्ध झाले. नगरांची आखीव बांधणी, सांडपाण्याची उत्तम व्यवस्था, पक्क्या विटांचे बांधकाम, उत्कृष्ट कलावस्तू ही या संस्कृतीची वैशिष्ट्ये होती. ही नगरे तटबंदीयुक्त होती. या लोंकांना घोडा माहीत नव्हता. त्यावरून ही संस्कृती आर्यांची नसून अनार्यांची द्राविडी होती असा तर्क केला गेला आणि आर्यांनी बाहेरून येऊन त्यांची म्हणजे दासांची/दस्युंची नगरे उध्वस्त केली असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला गेला. ऋग्वेदात इंद्राने दस्युंची तटबंदीयुक्त 'पुरे' फोडल्याचा उल्लेख आहे. शंबराच्या ९९ पुरांची नासधूस इंद्राने केल्यामुळे त्याला 'पुरंदर' असे बिरुद दिले गेले. त्यावरून सिंधु संस्कृती ही अनार्यांची संस्कृती होती असे मानण्यात येऊ लागले.
पुरातत्त्वाच्या या निर्णायक पुराव्याला भाषाशास्त्रीय पुराव्याची जोड देण्यात आली.

बलुचिस्तानमधील डोंगराळ प्रदेशातील काही जमाती ब्राहुई भाषा अद्यापि बोलतात. ही भाषा द्राविडी आहे असे भाषाशास्त्रज्ञांचे मत आहे. त्यावरून प्राचीन काळी त्या प्रदेशात द्राविडी भाषा बोलली जात होती आणि सिंधु संस्कृतीची भाषाही द्राविडी होती, असा समज होता. आर्यानी त्यांचा पराभव केल्यानंतर ह्या द्राविडी मंडळींचे दक्षिणेत स्थलांतर झाले. काही लोक बलुचिस्तानच्या डोंगराळ भागात पळून गेले आणि त्यांचे वंशज ब्राहुई असे हिरीरीने प्रतिपादन करण्यात आले.

या दोन पुरातत्त्वीय शोधांमुळे आर्य भारतात बाहेरून आले या मताला पुष्टी देणाऱ्या विद्वानांना बळ प्राप्त झाले. या उलट आर्यांचे मूळ वसतिस्थान भारत असून ते येथून बाहेर गेले या मताच्या विद्वानांनी ऋग्वेदातील पुराव्याचा उपयोग करून घेतला. त्यांच्या मते वेदात कोठेही ते बाहेरून आल्याचा उल्लेख नाही. उलट सप्तसिंधुची भूमी म्हणजे त्यांच्यासाठी 'देवनिर्मित' देश होता, असे ते सांगतात. या परस्परविरोधी मतांमुळे आर्यांचा प्रश्न अधिकाधिक जटिल होऊ लागला आहे. या संदर्भात निरनिराळ्या विद्वानांच्या मतांचा परामर्श घेणे आवश्यक आहे.

**गॉर्डन चाईल्ड**

एकोणिसाव्या शतकात आर्यांच्या प्रश्नांवर भाषाशास्त्रज्ञ प्रामुख्याने होते. वर उल्लेखिलेल्या पुरातत्त्वीय शोधानंतर पुरातत्त्वज्ञांनी या विषयात रस घेतला. गॉर्डन चाईल्ड या सर्वश्रेष्ठ पुरातत्त्वज्ञाने १९२६ मध्ये 'दि आर्यन्स' हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यांच्या मते आर्य लोक अत्यंत बुद्धिमान होते, हे हिंदूंनी आणि ग्रीकांनी प्राचीन काळी केलेल्या विलक्षण शास्त्रीय प्रगतीमुळे सिद्ध होते. त्यामानाने प्राचीन इजिप्शियन आणि बाबिलोनियन यांचे कार्य फिके पडते. चाईल्ड हे मार्क्सवादाच्या प्रभावाखाली असल्यामुळे सुरुवातीस आर्यांचे वसतिस्थान रशियात असावे असा त्यांचा ग्रह होता, परंतु पुढे त्यांनी ते मध्य आशियात असावे असे प्रतिपादन केले. तेथून ते पश्चिम आशियात आले. हे इजिप्त, ॲनाटोलिया (तुर्कस्थान) आणि मेसोपोटेमियात सापडलेल्या प्राचीन लेखातून आढळणाऱ्या संस्कृतजन्य नावावरून स्पष्ट होते, असे मत त्यांनी मांडले. इतकेच नव्हे, तर बोघाजकोई लेखातील राजे हे भारतीयच होते असे ते म्हणतात. त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या काळात पुरातत्त्वीय पुरावा आर्यांच्या समस्येची उकल करण्यासाठी फारसा उपयोगाचा नाही असे ते म्हणू लागले.

**मारीया गिम्बुटास**

या विद्वान स्त्रीचे संशोधन प्रामुख्याने पूर्व युरोपात होते. तेथे 'कुरगान संस्कृती'ची अनेक दफने (इ.पू. ४०००) आढळतात. त्यांत मानवांबरोबर घोडे, रथ हेही पुरले जात. ते लोकही आर्य (नॉर्डिक) वंशाचे होते, तेव्हा ते आर्यांचे पूर्वज होते असे त्यांचे मत होते.

**ऑक्सस संस्कृती**

रशियाच्या (पूर्वीच्या) दक्षिणेस आणि अफगाणिस्तानच्या उत्तरेकडील प्रदेशात अलीकडे नव्याने सापडलेल्या संस्कृतीला 'ऑक्सस संस्कृती' असे नाव दिले गेले आहे. तिला बॅक्ट्रिया-मार्गियाना आर्केऑलॉजिकल कॉम्प्लेक्स (BMAC) असेही नाव आहे. ही संस्कृती इंडो-इराणीयन असावी असे रशियन पुरातत्त्वज्ञ सरियानिदी आणि फिनिश विद्वान आस्को पारपोला यांनी प्रतिपादन केले आहे. तिचा काळ इ.पू. २१००-१७०० असा निश्चित केला आहे. या इंडो-इराणी लोकांच्या दोन शाखा झाल्या. एक इराणमध्ये गेली; दुसरी भारतात आली आणि त्यांनी वेद रचले. आस्को पारपोला ऑक्सस संस्कृती वैदिक आर्यांची समजतात. तेथे फक्त घोड्याची एकच आकृती एका खापरावर

आर्य एक यक्षप्रश्न ११

रंगविलेली आढळून आलेली आहे. पारपोलांच्या मते 'ऑक्सस संस्कृती' ही आर्यांच्या पूर्वजांची असून त्यांनी इ.पू. २००० नंतर भारतात स्थलांतर केले. मेहेरगढ (पाकिस्तान) येथील उत्खननातील आठव्या कालखंडात नव्याने आलेले लोक हे 'ऑक्सस संस्कृती'चे असावेत, असा पारपोला यांचा कयास आहे. परंतु 'ऑक्सस संस्कृती'चा एकही वैशिष्ट्यपूर्ण अवशेष अथवा वस्तू वा खापरे मेहेरगढ येथे सापडली नाहीत याचा या संदर्भात अवश्य उल्लेख केला पाहिजे.

अफगाणिस्तानातील बाल्ख (ग्रीक बॅक्ट्रिया किंवा प्राचीन संस्कृत साहित्यातील वाल्हिक देश) प्रांतात काही प्राचीन स्थळांचा अलीकडे शोध लागलेला आहे. त्यांना तटबंदी असल्याचे आढळून आले आहे. ही स्थळे वेदात वर्णिलेले दास/दस्युंचे 'पुर' असावेत असेही पारपोला यांनी प्रतिपादन केले आहे. ही तटबंदीयुक्त 'पुरे' आर्यांनी उद्ध्वस्त केली. त्याच्यापुढे जाऊन वेदातील दास म्हणजे इराणी 'दाह' होत. त्यांचा उल्लेख नंतरच्या काळातील पर्शियन राजांच्या कोरीव लेखात आहे. पारपोलांच्या एकूण विवेचनावरून असे दिसते की, आर्यांचे मूळ वसतिस्थान दक्षिण रशियात होते आणि तेथून ते अफगाणिस्तानात उतरले व पुढे इ.पू. २००० नंतर ते इराणमध्ये गेले आणि नंतर त्यांपैकी एक टोळी भारतात आली.

**कोलीन रेनफ्र्यू**

रेनफ्र्यू हे जगातील उच्च कोटीतील पुरातत्त्वज्ञ मानले जातात. ते केंब्रिज विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यांच्या मते आर्यांचे मूळ वसतिस्थान तुर्कस्तानात होते. ते भटके जीवन जगत होते. तुर्कस्तानात शेती करून स्थिर जीवनाची सुरुवात सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी झाली. या आर्यांच्या टोळ्यांचे पूर्वेकडे हळूहळू स्थलांतर सुरू झाले. त्यामुळे शेतीचे ज्ञान पश्चिम आशियात आणि तेथून भारतात पोहोचले, असा त्यांचा कयास आहे. मानव स्वतःचे अन्न निर्माण करू लागला, त्याला स्थिर जीवन लाभले. त्यामुळे लोकसंख्या भराभर वाढू लागली आणि परिणामतः मानवी स्थलांतर सुरू झाले. रेनफ्र्यू यांच्या या सिद्धान्तावर खूपच टीका झाली.

ॲण्ड्रोनोव्हो संस्कृती

रशियाच्या दक्षिणेकडील प्रदेशात एका संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. तिला 'ॲण्ड्रोनोव्हो संस्कृती' असे नाव दिले गेले आहे. ती इंडो-युरोपीय भाषा बोलणाऱ्या, म्हणजे आर्यांच्याच एका टोळीची संस्कृती असावी असे काही विद्वानांचे मत आहे. या संस्कृतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की त्या लोकांना घोडा अत्यंत प्रिय होता. तेथे सापडलेल्या प्राण्यांच्या हाडात ८० टक्के हाडे घोड्यांची आहेत. इ.पू. ४००० च्या सुमारास त्यांनी घोडा पाळण्यास सुरुवात केली होती. लगाम घोड्यांच्या दातावर घासल्यामुळे त्यांच्या दातांची जी झीज झाली होती त्यावरून हे सिद्ध होते. एकंदर पुराव्याचा विचार केल्यास इंडो-युरोपियन लोकांचे स्थलांतर इ.पू.

आर्यांच्या शोधात / १२

३३००-२२०० च्या सुमारास सुरू झाले असा निष्कर्ष काढण्यात आला आहे, आणि इंडो-इराणीयन मंडळी इ.पू. २००० च्या सुमारास स्थिरावली असे सांगण्यात येते. शिवाय 'ॲण्ड्रोनोव्हो संस्कृती' ग्रामीण असून तिची तुलना अवेस्ता आणि वेदातील वर्णनांशी जुळण्यासारखी आहे. या संस्कृतीचा काळ इ.पू. २३००- २१०० असा निश्चित करण्यात आला आहे.

**प्रा. रामशरण शर्मा**

प्रा. शर्मा हे भारतातील अत्यंत प्रगत विचाराचे इतिहासकार समजले जातात. पुरातत्त्व पुराव्याचा ते इतिहासाची रचना करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेतात. त्यांनी आर्यांच्या प्रश्नांवर अलीकडे दोन छोटी पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. पुरातत्त्वाच्या पुराव्यावरून आर्य बाहेरून भारतात आले. घोडा आणि आऱ्याच्या चाकाचा पुरावा आणि इतर अवशेष यावरून ते इ.पू. १५०० च्या सुमारास भारतात आले, असे ते प्रतिपादन करतात. याचे मुख्य कारण असे की, यासंबंधीचा इ.पू. २००० पूर्वीचा विश्वसनीय पुरावा उपलब्ध नाही. शिवाय लोथल आणि कालीबंगन येथील उत्खननात सापडलेली अग्निकुंडे ह्या शेकोट्या किंवा खड्‌ड्यात खणलेल्या चुली आहेत, असे ते म्हणतात. हल्लीची घग्गर नदी ही वेदातील सरस्वती नव्हे. भाषाशास्त्राचा पुरावाही त्यांच्या मताला पुष्टी देतो असे ते सांगतात. आर्यांचे मूळ वसतिस्थान कॉकेशस पर्वताच्या आसपास होते, ह्या रशियन विद्वानांच्या निष्कर्षांशी ते सहमत आहेत. वेदातील यदु, तुर्वश, कुरू आणि उत्तरमद्र या जमाती हिमायलापलीकडून आल्याचा उल्लेख आहे. तसेच पुरुरवस् ऐल हा वेदातील अति प्राचीन राजा बॅक्ट्रियामधून आला होता, त्यावरून त्यांच्या सिद्धांताला बळकटी येते. विख्यात इतिहासकार रमिला थापर यांचेही जवळपास असेच मत आहे.

राजेश कोच्छर

डॉ. कोच्छर हे खगोलशास्त्रातील तज्ज्ञ आहेत. त्यांनी वेदातील खगोलशास्त्राच्या पुराव्यावरून आर्य भारतात बाहेरून आल्याचे दाखविले आहे. त्यांच्या मते भारतातील आजपर्यंतच्या उत्खननात वेदातील वर्णिलेल्या संस्कृतीशी मिळतीजुळती एकही संस्कृती सापडलेली नाही. मध्य आशियातील नमाझगा, आल्टिन डेपे येथील अवशेषांत त्यांना आर्यांचे उगमस्थान असावे असे वाटते. त्या नागरी संस्कृतींचा पर्यावरणातील बदलामुळे इ.पू. २१०० च्या सुमारास ऱ्हास झाल्या आणि तेथील लोकांना स्थलांतर करावे लागले. हे इंडिक (इंडो-आर्यन) भाषा बोलणारे लोक इ.पू. २०००-१८०० मध्ये प्रथम भारतात आले आणि त्यानंतर इ.पू. १४०० मध्ये आणखी काही आले. हे वेदातील आर्य होत असे त्यांना वाटते.

खगोलशास्त्राच्या पुराव्याचा वेद-वाङ्मयाचा कालनिर्णय करण्यासाठी कसा उपयोग होतो, त्याचे त्यांनी एक उदाहरण दिले आहे. शतपथै ब्राह्मणात एके ठिकाणी कृत्तिका नक्षत्रावर यज्ञाचा अग्नी प्रज्वलित करावा, असा उल्लेख आहे. त्यावरून त्याचा काळ इ.पू. २३०० असे त्यांनी दाखवून दिले आहे. तसेच वेदांग ज्योतिषात सगळ्यात मोठा दिवस आणि सगळ्यात लहान रात्र यांचे प्रमाण असल्याचे जे सांगितले आहे, त्यावरून. आर्यांचे मूळ वसतिस्थान उत्तरेत ३५ अंश अक्षांशावर असावे, असे त्यांचे मत आहे.

**लॅम्बर्ग - कार्लोव्हस्की**

अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठातील पुरातत्त्वाचे प्राध्यापक लॅम्बर्ग-कार्लोव्हस्की यांनी इराण- अफगाणिस्तान या भागात उत्खनन केले आहे. त्यांच्या मते आर्यांचे दोन प्रमुख गट होते. त्यापैकी एक युरोपमध्ये गेला आणि दुसरा इराणमध्ये. दुसऱ्या गटातील एक टोळी फुटून भारतात आली. ते वैदिक आर्य होत. त्यांच्या मते 'ऑक्सस संस्कृती' मध्ये (बॅक्ट्रिया-मार्गियाना- आर्केऑलॉजिकल कॉम्प्लेक्समध्ये) आर्य संस्कृतीचा उगम शोधणे चूक आहे. ती नागरी संस्कृती आहे आणि त्या लोकांजवळ घोडा आणि रथ नव्हता. तसेच भारतात या संस्कृतीचे अवशेष कोठेही सापडत नाहीत. 'ॲण्ड्रोनोव्हो संस्कृती'च्या बाबतीतही तेच झाले आहे. त्यांचा एकही अवशेष भारतात सापडत नाही. याशिवाय 'ऑक्सस संस्कृती'ची शहरे आणि इतर वसाहती इ.पू. १५०० च्या सुमारास पर्यावरणातील बदलामुळे आणि वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे उजाड होऊन त्या लोकांच्या नशिबी भटके जीवन आले.

लॅम्बर्ग-कालॉव्हस्कींच्या मते हा एक यक्षप्रश्न आहे. कोलीन रेनफ्र्यू यांनी त्यांच्यावर टीका केली आहे. या प्रश्नाची उकल करण्यासाठी प्रथम हे ध्यानात घेतले पाहिजे की, घोड्याचा उपयोग प्रथम शेतीसाठी आणि नंतर आऱ्याची चाके असलेल्या रथासाठी इ.पू. २००० नंतर करण्यात आला. त्यानंतर इ.पू. १००० च्या सुमारास घोड्यावर बसण्यास सुरुवात झाली आणि त्याचा लढाईत वापर सुरू झाला. बोघाजकोईच्या कोरीव लेखाच्या पुराव्यावरून असे म्हणता येईल की आर्यांचा काळ अधिक मागे जाणे शक्य आहे. सोम पुराव्यावस ही वनस्पती त्यांना 'ऑक्सस संस्कृती'च्या लोकांकडून मिळाली असेल. शिरीन रत्नागरच्या मते आर्यांच्या प्रश्नाचे उत्तर पुरातत्त्वात सापडणार नाही.

**डॉ. ब्रिजबासी लाल**

अनेक भारतीय विद्वानांच्या मते आर्य मूळ भारतातलेच होते व ते येथून नंतर बाहेर गेले. शिवाय ऋग्वेद इ.पू. ५००० इतका किंवा त्याहूनही प्राचीन आहे, असा त्यांचा दादा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सिंधु संस्कृतीच्या स्थळांची उत्खनने मोठ्या प्रमाणावर झाली असल्यामुळे ती वैभवशाली संस्कृती वैदिक आर्यांची असावी असे मत आता हिरिरीने मांडण्यात येऊ लागले आहे. ऋग्वेदात आर्य बाहेरून येथे आल्याचा कोठेही उल्लेख नाही. उलट येथील सप्तसिंधुचा प्रदेश म्हणजे सिंधु आणि सरस्वती यांच्या मधला भूभारा- हेच त्यांचे मूळ स्थान असावे, असा समज आहे. त्याला ते देवनिर्मित देश, म्हणजे देवाने त्यांच्याकरता निर्माण केलेला प्रदेश, असा समजतात.

प्रा. ब्रिजबासी लाल हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भारतीय पुरातत्त्वज्ञ आहेत. त्यांचा या क्षेत्रातील अधिकार फार मोठा आहे. पूर्वी त्यांनी हस्तिनापूर (जि. मीरत, उत्तर प्रदेश) येथे उत्खनन करून महाभारतकालीन संस्कृतीचा शोध लावला होता. नंतर त्यांनी राजस्थानात कालीबंगन येथे मोठ्या प्रमाणावर उत्खनन केले, अलीकडे त्यांच्या काही लेखांत आणि ग्रंथांत त्यांनी आर्यांच्या समस्येवर लिखाण केले आहे. 'सरस्वती फ्लोज ऑन' हे त्यांचे अलीकडचे पुस्तक. त्यात त्यांनी सिंधु संस्कृती हीच वैदिक आर्यांची संस्कृती होय हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या दोन्ही संस्कृतींची

भौगोलिक व्याप्ती जवळजवळ सारखीच आहे आणि त्यांच्या काळामध्येही फारसा फरक नाही. तेव्हा वैदिक आर्य हेच सिंधु संस्कृतीचे निर्माते असण्याची दाट शक्यता आहे. अर्थात सिंधु लिपी वाचण्यात आल्यानंतर याचा निर्णायक पुरावा आपल्या हाती येईल हे ते मान्य करतात. आर्य संस्कृती ग्रामीण होती. शेती आणि पशुपालन यावर त्यांची उपजीविका होत असे हे जे सांगितले जाते ते निखालस चूक आहे. या उलट ही नागरी संस्कृती होती, त्यांच्याकडे बोटी होत्या, त्यांचा समुद्रांतर्गत व्यापार होता. त्यांचे राजे, सम्राट राज्य करीत असत, त्यांच्याकडे घोडा होता. ते यज्ञ करीत असत हे कालीबंगन येथील सापडलेल्या उत्खननावरून सिद्ध होते. इ.पू. ४००० असा ऋग्वेदाचा काळ त्यांनी निश्चित केला आहे. युरोपियन विद्वान आर्यांचे मूलस्थान युरोपमध्ये असल्याचे प्रतिपादन करतात, स्कॅंडिनेव्हिया, फिनलंड, दक्षिण रशिया, जर्मनी, लिथुआनिया, हंगेरी, डॅन्यूबचे खोरे इत्यादी प्रदेशांत ते असावे, असे त्यांचे अनुमान आहे. भारत मात्र त्यात नाही. याउलट वाङ्मयीन आणि पुरातत्त्वीय पुराव्यांच्या आधारे ते भारतातच असण्याची दाट शक्यता आहे असे मत प्रा. लाल हिरिरीने मांडतात. आर्यांचा काळ इ.पू. २००० च्या पूर्वीचा आहे याचा दाखला ते वाङ्मयीन आणि पुरात्त्वीय पुराव्याच्या आधारे देतात. ऋग्वेदातील सर्वात महत्त्वाची नदी सरस्वती. ती इ.पू. २००० नंतर आटू लागली. तेव्हा आंर्यांच्या वसाहती त्या आधीच्या काळातील असाव्यात हे उघड आहे. या काळात कोणती वैभवशाली संस्कृती भारतात नांदत होती? सिंधु संस्कृती हे सरळ उत्तर आहे. तेव्हा परिस्थितीजन्य पुराव्यावरून सिंधु संस्कृती म्हणजेच वैदिक आर्यांची संस्कृती असावी हे सिद्ध होते. तिचेच प्रतिबिंब आपल्याला ऋग्वेदात प्रतीत झालेले आढळते. त्याही पुढे जाऊन संस्कृत ही सिंधु संस्कृतीच्या लोकांची भाषा होती हेही मान्य करावे लागेल, असे ते म्हणतात.

ऋग्वेदात 'पुर' असा एक शब्द येतो. त्याचा निश्चित अर्थ काय असौवा याबद्दल विद्वानांत एकमत नाही. लाल यांच्या मते या शब्दाचा अर्थ 'नगर' असा करता येईल, तेंव्हा वेदातली 'पुरे' म्हणजे सिंधु संस्कृतीची 'नगरे' हे निराळे सांगणे नको; परंतु ऋग्वेदातील 'पुरे' ही दासांची होती, आर्यांची नव्हती, हे लाल सोयिस्कर विसरतात. या पुरांना तटबंदी होती आणि दास हे आर्यांचे शत्रू. तेव्हा सिंधु संस्कृतीची नगरे दासांची होती असे म्हणावे लागेल. शिवाय ही नगरे सरस्वती-सिंधुच्या खोऱ्यात नव्हती, तर वायव्येकडे होती. दासांचा राजा शंबर याची ९९ पुरे सुवास्तु (हल्लीची स्वात) नदीच्या खोऱ्यात होती. ही नदी पाकिस्तान अफगाणिस्तानातून वाहते. ही पुरे उद्ध्वस्त केल्यामुळे इंद्राला 'पुरंदर' हे बिरुद लाभले.

प्रा. लाल यांनी आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ मेहेरगढ येथील उत्खननात उपलब्ध झालेला पुरावा सादर केला आहे. तेथे इ.पू. ४५०० पासून इ.पू. १६०० पर्यंतचा, म्हणजे सिंधु संस्कृतीच्या अंतापर्यंतचा पुरावा मिळाला आहे. त्यावरून या काळात सांस्कृतिक विकास कसा झाला आणि सिंधु संस्कृतीचा उगम आणि तिचे नागरीकरण कसे झाले हे पाहावयास मिळते. मेहेरगढ येथे प्रथम वस्ती इ.पू. ७५०० मध्ये झाली. पहिले दोन खंड नवाश्मयुगीन आहेत. इ.पू. ४५०० च्या सुमारास तेथे नवीन लोक आले. त्यांनी अनेक नवीन गोष्टी आणल्या. चाकावर घडविलेली भांडी भारतीय उपखंडात त्यांनी प्रथम तयार केली, तांब्याचा वापर त्यांनी सुरू केला, तसेच मातृदेवतेची पूजा ते करीत. हे लोक बहुधा शेजारच्या अफगाणिस्तानातून आले असावेत. त्यांची अनेक दफने सापडली आहेत. त्यातील मानवी सांगाड्यांच्या पाहणींवरून त्यांचे एक वैशिष्ट्य शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. त्यांच्या दाढेतील खोलगट भाग हा हल्लीच्या युरोपियन लोकांच्या दाढेसारखा आहे. महत्त्वाची गोष्ट ही की हे लोक मेहेरगढ येथील आधीच्या नवाश्मयुगीन लोकांपेक्षा निराळे होते. त्यांच्या नंतर इ.पू. ८०० पर्यंत भारतीय उपखंडात कोणीही नवीन लोक आले नाहीत. मेहेरगढच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीला 'टोगाओ संस्कृती' असे नाव दिले गेले आहे. सिंधु संस्कृतीची प्राचीनता प्रा. लाल इ.पू. ४५०० पर्यंत मागे नेतात, परंतु हे 'टोगाओ संस्कृती'चे लोक कोठून आले याचा ते उल्लेख करत नाहीत.

प्रा. लाल यांच्या प्रतिपादनातील एक लक्षणीय दोष म्हणजे नागरी सिंधु काळातील लोकांजवळ घोडा होता किंवा नाही हा होय. घोडा हा आर्यांचा अत्यंत आवडता प्राणी. त्यांच्या धार्मिक जीवनातही त्याला स्थान होते. उदा. अश्वमेघ यज्ञ. नागरी सिंधु संस्कृतीचे लोक जर वैदिक आर्य असते तर घोड्याचा पुरावा सर्वत्र मिळावयास हवा. त्यांच्या मुद्रांवर अनेक प्राण्यांची चित्रे आहेत, परंतु त्यात घोडा आढळत नाही. काही स्थळांच्या उत्खननात मिळालेली हाडे

घोड्यांची असावीत असे सांगितले जाते, परंतु त्यांच्याबद्दल विद्वानांत वाद आहे. तेव्हा नागरी सिंधु संस्कृती ही वैदिक आर्यांची संस्कृती होती हे मान्य करता येणार नाही.

डॉ. सुरज प्रकाश गुप्त यांचेही मत प्रा. लाल यांच्याप्रमाणेच आहे. वैदिक ऋषिमुनी हे शहरात न राहता जंगलात आश्रम बांधून राहत असत. त्यामुळे वेदात शहरांचे उल्लेख क्वचित आढळतात. तेव्हा नागरी सिंधु आणि वैदिक ही एकाच संस्कृतीचे दोन भाग आहेत, असे डॉ. गुप्त सांगतात." केंब्रिज विद्यापीठातील विख्यात पुरातत्त्वज्ञ कोलीन रेनफ्र्यू यांनाही नागरी सिंधु ही आर्यांची असावी असे वाटते. डॉ. रंगनाथ राव यांचेही असेच मत आहे आणि ते सिद्ध करण्यासाठी त्यांनी सिंधु लिपीचा पुरावा सादर केला आहे. त्यांनी सिंधु लिपी वाचण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील ४०० हून अधिक चिन्हे ही मुळात ४० चिन्हांची रूपे आहेत असे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यांपैकी १७ चिन्हांचे सेमिटिकमधली चिन्हांशी विलक्षण साम्य आहे. त्यांचा उपयोग करून डॉ. राव यांनी सिंधु मुद्रांवरील लेखांचे वाचन केले आहे. त्यांच्या मते त्या लेखांची भाषा संस्कृत आहे. त्यात वैदिक राजांची, जमातींची नावे आहेत आणि त्यामुळे सिंधु संस्कृती वैदिक आर्यांची आहे असे त्यांनी दाखवून दिले आहे. मात्र त्यांचे वाचन विद्वानांना मान्य नाही.

**भगवान सिंह**

श्री. भगवान सिंह यांनी अलीकडे 'वेदिक हराप्पन" असा एक ग्रंथ लिहिला आहे. आर्यांचे सांस्कृतिक अवशेष भारतात का सापडत नाहीत असा प्रश्न ते करतात आणि त्याचे उत्तरही देतात. सिंधु संस्कृती आणि वैदिक संस्कृती ही एकच असल्यामुळे त्यांचे निराळे अवशेष असण्याचा प्रश्नच नाही. पर्यायाने वैदिक वाङ्मय हे सिंधु लोकांचे असल्यामुळे त्यात त्यांच्या संस्कृतीचे चित्रण आहे असे ते मानतात. हे गृहीत धरल्यानंतर प्रश्नच राहत नाही. डॉ. रामसिंग बिश्त यांनी बनावली आणि धोलावीरा येथे दीर्घकाळ उत्खनन केले. या सिंधु संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननातील पुराव्यावरून ती आर्यांची होती, असे त्यांना वाटते.

**गांधार दफन संस्कृती**

प्राचीन गांधार देश म्हणजे हल्लीचा पाकिस्तानातील वायव्येकडचा प्रदेश. तेथे अलीकडे केलेल्या उत्खननात दफने सापडली. त्यात घोड्यांचे अवशेष आहेत. ही संस्कृती आर्यांची होती असा उत्खनकांचा दावा आहे. ती अश्वकायन म्हणजे ग्रीक इतिहासकारांनी उल्लेखिलेले अस्सिकेनॉय यांची असावीत असे प्रा. अहमद हसन दाणी 'यांनी प्रतिपादन केले आहे. परंतु या लोकांची फक्त दफनेच सापडली आहेत. त्यांच्या वस्त्या सापडत नाहीत. त्यामुळे हे मत ग्राह्य होण्यासारखे नाही.

**भाषाशास्त्रीय पुरावा**

आर्यांचा प्रश्न मुळातच भाषाशास्त्राच्या उगमापासून निर्माण झाला आणि सुरुवातीस त्यात संशोधन करणारे विद्वान भाषाशास्त्री होते. भाषांच्या तौलनिक अभ्यासामुळे तो निर्माण झाला आणि त्यातून भाषाशास्त्र ह्या ज्ञानशाखेचा उगम झाला. संस्कृतमुळे तो निर्माण झाला म्हणून ती साऱ्या भाषांची जननी झाली. एकोणिसाव्या शतकात अनेक भाषाशास्त्रांनी आर्यांच्या उगमस्थानासंबंधी विचार मांडले. तसे पाहिल्यास बोधाजकोई आणि सिंधु संस्कृतीचा शोध लागेपर्यंत आर्यांचा प्रश्न हा फक्त भाषिक प्रश्न आहे असे समजले जात होते.

**लोकमान्य टिळक**

लोकमान्य टिळक हे एक थोर राजकीय पुढारी होते, परंतु ते उच्च कोटीचे विद्वानही होते. गणित, संस्कृत या विषयांत त्यांना विशेष गती होती आणि शिक्षकी पेशाची अधिक आवड होती. मॅक्समुल्लर आणि इतर पंडितांनी ऋग्वेदाचा कालखंड जो इ.पू. १००० मध्ये निश्चित केला होता तो त्यांना मान्य नव्हता. टिळकांना खगोलशास्त्रातही रस होता. एकदा भगवद् गीतेतील श्लोक म्हणत असताना 'महिन्यामध्ये जसा मार्गशीर्ष तसा कृष्ण' (मासानाम् मार्गशीषर्षोऽहम्) असा उल्लेख आला. त्याचा वेद-वाङ्मयाचा कालक्रम ठरविण्यासाठी बहुमोल उपयोग होईल असे त्यांच्या ध्यानात आले आणि त्यांनी त्या दिशेने संशोधन केले. ते म्हणतात,

तैत्तिरीय संहिता आणि ब्राह्मणांच्या काळात ऋग्वेदातील ऋचांचा अर्थ लावणे अवघड झाले होते, कारण त्या दुर्बोध झाल्या होत्या. तैत्तिरीय संहितेच्या काळात वसंत- संपात कृत्तिकेत होता आणि त्यावरून त्यांचा काळ मी इ.पू. सुमारे २५०० असा ठरविला होता. त्यावेळी जर ऋग्वेद दुर्बोध झाला होता, तर त्याचा काळ त्यापूर्वी अनेक शतके मागे जातो. या पुराव्याचा उपयोग करून टिळकांनी वेद-वाङ्मयाचा काळ खालीलप्रमाणे निश्चित केला.

१. ओरायनपूर्व काळ (इ.पू. ६०००-४०००): आर्यांच्या संस्कृतीचा हा अति प्राचीन कालखंड होता. त्याला अदिती असे नाव देता येईल.

२. ओरायन काळ (इ.पू. ४०००-२५००): हा 'आर्य' संस्कृतीचा सर्वात 'महत्त्वाचा कालखंड होता.

३. कृत्तिका काळ (इ.पू. २५००-१४००): हा तैत्तिरीय संहितेचा कालखंड होता. या काळात अनेक ब्राह्मणग्रंथांची रचना झाली. ऋग्वेदातील अनेक ऋचा दुर्बोध झाल्या होत्या आणि पंडितांमध्ये त्यांचा नेमका अर्थ काय असावा याची चर्चा होत असे.

४. बुद्धपूर्व काळ (इ.पू. १४००-५००): या काळात सूत्र वाङ्मयाची निर्मिती झाली.

लो. टिळकांनी त्यांच्या अभ्यासावरूनन खालीलप्रमाणे निष्कर्ष काढला :खगोलशास्त्राची पद्धत तशी थोडी अस्पष्ट असल्यामुळे आपल्याला वेदांचा निश्चित काळ ठरविता येत नाही, परंतु भाषाशास्त्रीय पद्धतीपेक्षा ती खूपच उपयोगाची आहे. त्यामुळे आपल्याला अनेक गोष्टींचा, उदा. संपात इत्यादींचा, कालनिर्णय करता येतो आणि त्याच्या साहाय्याने इतर कालखंडाचा निर्णय करण्यास मदत होते. लो. टिळकांनी ठरविलेला हा कालक्रम अनेक विद्वानांना मान्य नव्हता. काहींना तो पटला. हर्मन याकोबी यांनी निश्चित केलेला कालक्रम टिळकांनी दिलेल्या कालक्रमाशी मिळताजुळता होता.

त्यांनी आपल्या 'ओरायन' या ग्रंथात वेद-वाङ्मयाचा कालक्रम वर दिल्याप्रमाणे निश्चित केला. त्यानंतर आर्यांच्या मूळ वसतिस्थानासंबंधी संशोधन करून 'आर्कटिक होम इन् द वेदाज' हा ग्रंथ लिहिला. त्यासाठी त्यांनी ऋग्वेदातील काही विधानांचा आधार घेतला. एका ऋचेत 'सूर्योदयात् प्राक् बहूनि अहानि आसन्' असा उल्लेख आहे. याचा अर्थ 'सूर्योदय होण्यापूर्वी खूप काळ लोटला आहे;' म्हणजेच दीर्घकाळ दिवस आणि दीर्घकाळ रात्र अशा प्रदेशांत आर्यांची वस्ती होती. हा प्रकार फक्त उत्तर ध्रुवाच्या आसपासच्या प्रदेशांत आढळतो, परंतु तेथे मानवी वस्तीच्या खुणा आढळत नाहीत. टिळकांनी हा ग्रंथ जेव्हा लिहिला त्या काळी काही भूगर्भशास्त्रज्ञांनी असे अनुमान केले होते की, आठ-नऊ हजार वर्षांपूर्वी उत्तरध्रुव आता आहे त्यापेक्षा खाली दक्षिणेच्या भागात होता आणि त्यामुळे तेथे मानवी वस्तीला पर्यावरण अनुकूल होते; तेव्हा तेथे आर्यांची वस्ती असावी असे अनेक विद्वानांचे मत होते. त्यामुळे टिळकांनी वैदिक आर्यांचे मूळ वसतिस्थान उत्तर ध्रुवाच्या प्रदेशात असावे असा सिद्धांत मांडला.

**बोंगार्ड-लेव्हिन**

लोकमान्य टिळकांच्या सिद्धांताशी अनेक विद्वान सहमत होते. त्यापैकी रशियन पंडित बोंगार्ड-लेव्हिन हे एक होत. त्यांच्या मते महाभारत, मनु-स्मृती, पुराणे यांच्या पुराव्याच्या आधारे टिळकांच्या सिद्धांताला दुजोरा मिळतो. प्रसिद्ध प्राचीन गणिती आर्यभट, भास्कराचार्य यांच्या मते आर्यांचे मूलस्थान मेरू पर्वताच्या प्रदेशात होते. तेथे दीर्घकाळ दिवस व रात्र असतात. ग्रीक पुराणात 'रिप्' म्हणजे पर्यंत आणि ऋग्वेदातही 'रिप' म्हणजे पर्वत असा अर्थ आहे. त्याच्या शिखरावर गरुडाचे वास्तव्य असते आणि तेथे सहा महिने दिवस आणि सहा महिने रात्र असते. हा डोंगर काळ्या समुद्राच्या उत्तरेला असावा असे बोंगार्ड-लेव्हिन. यांचे मत आहे. आर. जी. हर्षे यांनी मध्य आशियातील अल्टाई डाग हा पर्वत म्हणजे मेरू पर्वत असावा असे अनुमान केले आहे. मंगोलियात त्याला अलेन्-उला असे नाव आहे. त्याचा अर्थ 'सोन्याचा पर्वत' असा होतो. १८

**बरो**

केंब्रिज विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक बरो हे एक महापंडित मानले जातात.' बोघाजकोई येथील लेख इंडो-इराणी भाषेत नसून इंडो-आर्यन भाषेत आहेत; तेव्हा आर्यांचे पूर्वज मेसोपोटेमियाच्या उत्तरेस आणि इराणच्या पठारी प्रदेशांत कोठेतरी राहत असावेत असे त्यांचे प्रतिपादन आहे. आर्यांच्या शाखा इराणमध्ये आणि भारतात्त. स्थिरस्थावर झाल्यानंतर त्यांच्या भाषा स्वतंत्र झाल्या. तेव्हा वैदिक आर्य थेट त्यांच्या मूळ वसतिस्थानाहून भारतात येऊन राहिले असे

म्हणता येणार नाही. भारतातून ते बोघाजकोई (तुर्कस्तान) येथे गेले नसावेत यात शंका नाही. याचा अर्थ असा की इंडो-इराणी आणि इंडो-आर्यन या टोळ्या आर्य भारतात येण्यापूर्वी निर्माण झाल्या, असाव्यात, असा होतो.

गामक्रेलिड्झे आणि इवानोव्ह या दोन रशियन विद्वानांनी बिलियर्डच्या खेळाचा आकृतिबंध तयार केला आहे. या खेळात ज्याप्रमाणे सुरुवातीस सगळे चेंडू गोळा करून एकत्र ठेवतात आणि नंतर काठीने ढोसल्यामुळे सर्वत्र पसरतात, तसे आर्यांच्या निरनिराळ्या टोळ्यांच्या स्थलांतरात झाले असावे आणि त्यांचे केंद्रस्थान मध्य आशियात किंवा दक्षिण रशियात असावे.

**एस. एस. मिश्र**

प्रा. मिश्र हे संस्कृतचे आणि विशेष म्हणजे वेदविद्येचे नाणावलेले विद्वान आहेत. त्यांनी बोघाजकोई लेखाच्या पुराव्यावरून एक अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष काढला आहे." त्यातील देवतांची नावे आणि अंक हे इंडो-इराणी भाषेत नसून इंडो-आर्यन आहेत हे त्यांनी दाखवून दिले. ते इंडो-इराणी असते तर, नासत्यचे नाहत्य आणि 'सत्त चे' 'हत्त' अशी रूपे आली असती. तसेच पश्चिम आशियात अलीकडे आढळत आलेल्या मोराच्या पुराव्यावरून हा भारतीय पक्षी तिकडे इंडो-आर्यन भाषा बोलणाऱ्यांबरोबर गेला असावा असे अनुमान केले, ते मान्य करावे लागेल. इंडो-आर्यन भाषिक इ.पू. २००० नंतर भारतातून इराणमध्ये आणि पुढे तुर्कस्तानात गेले असावेत असे त्यावरून सिद्ध होते. मेसोपोटेमियातही काही संस्कृत व्यक्तिनामे (उदा. सोमसेन, अरिसेन) आढळून आली आहेत. काही शब्दही कॅसाईट लोकांच्या लेखात (इ.पू. १७५०-११००). आहेत. त्यावरुन इंडो-इराणी लोक इंडो-आर्यन लोकांपासून इ.पू. २००० च्या सुमारास वेगळे झाले असे म्हणता येईल. ज्याप्रमाणे इंग्रजी शब्द भारतीय भाषांत इंग्रजांबरोबर आले त्याप्रमाणे इंडो-आर्यन शब्द आर्यांबरोबर भारतातून तिकडे गेले असावेत. प्रा. मिश्रांच्या मते वेदांचा काळ इ.पू. ५००० इतका मागे जातो.

**भार्गव**

पी.एल. भार्गवही वेदाचा काळ इ.पू. ५००० इतका मागे नेतात. वैदिक आर्यांना खूप प्राचीन काळी त्यांचे मूळ वसतिस्थान महापुरामुळे सोडून स्थलांतर करावे लागले. मनु हा त्यांचा पुढारी. अवेस्तामध्येही अशा प्रकारचे वर्णन आहे. आर्यानाम् वेजो हे त्यांचे मूलस्थान; ते घोडबंद आणि पंजशीर नद्यांच्या दुआबात अफगाणिस्तानमध्ये होते असे भार्गव यांचे मत आहे.

**सेठना**

के.डी. सेठना आर्य बाहेरून भारतात आले हे मान्य करतात. ते नंतर सप्तसिंधुच्या प्रदेशात स्थायिक झाले. ते अति प्राचीन काळी आल्यामुळे त्यांची मूलस्थानाची स्मृती राहिली नाही. नंतर ते तेथून पश्चिम आशियात गेले. ऋग्वेदातील आर्य संस्कृती हडप्पापूर्व (३५००-३००० इ.पू.) काळातील आहे असे सेठनांचे मत आहे. आर्य आणि द्रविडियन हे दोन निरनिराळे लोक नसून, एकच होते; फक्त त्यांच्या संस्कृती समकालीन होत्या. आर्यांचे मूळ वसतिस्थान अफगाणिस्तान असावे असे सेठना यांना वाटते.

**विट्झेल**

मायकेल विट्झेल हे हार्वर्ड विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक आहेत. त्यांचे वेदांवरील संशोधन जगन्मान्य आहे. आर्यांची मूळ वस्ती तुर्कमेनिस्तान-बॅक्ट्रिया या प्रदेशात होती. त्यांच्या एकंदर लिखाणावरून 'ऑक्सस संस्कृती' ही आर्यांची होती असा समज होतो. ते अर्थात तसे स्पष्ट म्हणत नाहीत. त्यांच्या मते आर्यांचे मूळ वसतिस्थान मध्य आशियात होते. आर्यांच्या टोळ्या भारतात दोनदा आल्या. पहिल्या टोळीत यदु, तुर्वश, अंनु आणि द्रुह्यु या चार जमाती आल्या आणि सप्तसिंधुच्या प्रदेशात स्थिरावल्या. दुसऱ्या टोळीत पुरु आणि त्यांच्यात्तील भरतांचा गट आला आणि ते प्रबळ झाले. ऋग्वेदाची निर्मिती पुरू आणि भरत यांची आहे. या सर्व टोळ्या अफगाणिस्तानाच्या डोंगराळ प्रदेशातून भारतात आल्या. विट्झेल. लिहितात "ऋग्वेदातील युद्धाच्या ऋचांवरून तत्कालीन भूगोलाची कल्पना येते आणि भरत येथे कसे आले, हे स्पष्ट होते. वसिष्ठाने सिंधु पार केली (७.३३.९). त्यानंतर परुष्णी (पाकिस्तानातील रावी) नदीच्या तीरावर दाशराज्ञ युद्ध झाले... नंतर ते यमुनेच्या तीरावर येतात (७.१८.१९). भरत आणि वसिष्ठ मूळ इराणमधील, तेथून ते भारतात येतात (७.३३.३). या प्रमाणे इंद्राने (भरताबरोबर) सिंधु पार केली, भेदाला (यमुनातीरी ठार केले आणि

दाशराज्ञ युद्धात सुदासाला मदत केली. आर्य यमुनेपर्यंत पोहोचलेले असले तरी त्यांचे केंद्र पुरुंचा पराभव केल्यानंतर सरस्वतीच्या प्रदेशातच राहिले."

**तलगेरी**

तलगेरींना विट्झेलचे प्रतिपादन अजिबात मान्य नाही. आर्य हे मूळ भारतातीलच आहेत असे त्यांचे ठाम मत आहे. आर्य हे नॉर्डिक वंशाचे होते हे युरोपियन विद्वानांचे विधान चूक आहे कारण ऋग्वेदात आपल्याला निरनिराळ्या प्रकारचे लोक दिसतात. थोडक्यात आज जसे निरनिराळ्या प्रकारचे लोक भारतात आहेत तसे ऋग्वैदकाळात होते. अंगिरस आणि कण्व ऋषी हे सावळ्या रंगाचे होते (ऋ. १०.३१.११) आणि एक तपकिरी त्वचेचे होते (२.३.९). शिवाय आर्यांची भारतावर स्वारी झाली हे आता पुराव्याअभावी कोणीही मानत नाही. ऋग्वेदात उल्लेखिलेले दास हे इराणी होते आणि ते असुरांची पूजा करीत. तलगेरी ऋग्वेदाचा काळ इ.पू. ३००० असा ठरवितात.

**मॅलरी**

मॅलरी यांचा या विषयावरचा ग्रंथ उल्लेखनीय आहे. आर्यांची समस्या जेम्स पार्सन्सने १८६७ मध्ये भाषांचे चार गट पाडून निर्माण केली. आर्य मूळचे युरेशियामधील हे मॅलरींना मान्य आहे. तेथे ते प्रोटो-इंडो-युरोपिय भाषा बोलत असत. साऱ्या इंडो- युरोपियन भाषांची ती जननी. ऋग्वेदाचा काळ इ.पू. १५००-१२०० हा आहे, असे मॅलरींना वाटते. त्यांच्या मते इंडो-आर्यन भाषेचा अति प्राचीन पुरावा भारतात नसून सीरियात आहे. तेथे मिटानी भाषेत काही इंडो-आर्यन शब्द आढळतात. तसेच ते इजिप्तमध्ये टेल अमार्ना आणि तुर्कस्तानात बोघाझकोई लेखात आहेत. परंतु मिटानी साम्राज्याचा ऱ्हास झाल्यानंतर पश्चिम आशियातील इंडो-आर्यन भारतात आले असावेत हे अशक्य आहे कारण त्याला पुरावा नाही. अवेस्ताचा काळ मॅलरी इ.पू. १४०० पर्यंत मागे नेतात. त्यांच्या मते सिंधु संस्कृतीच्या लोकांची भाषा एलामाईट असावी. ती द्राविडी भाषा असून एलाम या इराणच्या दक्षिणेकडील प्रदेशात बोलली जात असे. तेव्हा आर्यांचा सिंधु संस्कृतीशी संबंध जोडता येणार नाही. वैदिक आर्य हे खेड्यात राहणारे, अडाणी, अशिक्षित लोक असून त्यांचा व्यापार नव्हता. लढाई आणि कर्मकांड एवढेच त्यांना माहीत होते.

**कझानास**

निकोलस कझानास या ग्रीक विद्वानाच्या मते आर्यांनी बाहेरून भारतावर स्वारी केली ही विधाने आता या पुस्तकातून काढून टाकावीत, २६ कारण नव्याने प्राप्त झालेल्या पुराव्यानुसार वेदांचा काळ इ.पू. ३१०० असा ठरविता येतो. बोघाजकोई येथे हिटाईट बाहेरून आले. ते खूप दुरून आले असावेत. शिवाय आर्य हे सप्तसिंधुच्या प्रदेशात . बाहेरुन आल्याचा उल्लेख कोठेही नाही आणि त्यांना त्याची स्मृतीही नाही. ऋग्वेदातील 'नदी-स्तुती'तील ऋचांवरून ते मूळचे येथील रहिवासी होते हे सिद्ध होते. पार्जिटरचेही असेच मत होते.

**एडर्डोसी**

आर्यांचे मूळ वसतिस्थान भारतात होते असे मानणारे जे थोडे युरोपियन विद्वान आहेत, त्यापैकी जॉर्ज एडॉसी एक आहेत. आर्य मध्य आशियातून भारतात आले नाहीत. वनस्पती आणि प्राणी यांची नावे याची साक्ष देतात. ती सारी भारतातील आहेत. 'ऑक्सस संस्कृती' सुधारलेली, प्रगत नागरी संस्कृती होती, याउलट वैदिक आर्य पशुपालक होते. शिवाय आर्यांनी भारतावर स्वारी केल्याचा काहीही पुरावा नाही.

**ब्रायन्ट**

एडविन ब्रायन्ट यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात आर्यांसंबंधीच्या सर्व संशोधनाचा आढावा घेतलेला आहे. सर्वंकष पुराव्याचा विचार केल्यावर शेवटी आर्यांचे मूळ वसतिस्थान कॅस्पियन समुद्राच्या आसपासच्या प्रदेशांत होते, असे त्यांचे मत आहे. त्यांच्या शेजारील फिनो उम्रीयन भाषेतील काही शब्द त्यांनी घेतले. तेथून
स्थलांतर करून भारतात येताना 'ॲण्ड्रोनोव्हो' आणि 'ऑक्सस' संस्कृतीचा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्यांच्यातील एक टोळी म्हणजे मिटानी, त्यांनी पश्च्निम आशियात राज्य स्थापन केले. ते भारतात आले तेव्हा सिंधु संस्कृतीचा ऱ्हास सुरू झाला होता. त्यामुळे तेथे सत्ता स्थापन करणे त्यांना सहज शक्य झाले. त्यांनी आपल्याबरोबर घोडा, रथ, आऱ्याचे चाक आणले. इ.पू. १५००-१००० या काळात ऋग्वेद रचला गेला.

**वांशिक सिद्धांत**

विल्यम जोन्सने भाषाशास्त्रीय सिद्धांत मांडला. त्यामुळे जगातील सर्व संस्कृतीचे उगमस्थान भारतात आहे असे समजले जाऊ लागले. ग्रीक, लॅटिन भाषांसुद्धा संस्कृतपासून निर्माण झाल्या. हा हर्षोन्माद क्षणभंगुर ठरला, कारण ब्रिटिश राज्यकर्त्यांना त्यांचे वर्चस्व स्थापन करावयाचे होते. जर्मन लोकांनी मात्र आर्यांचा उपयोग आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी केला. ऋग्वेदातील दास जरी काळे असले, तरी आर्य गोरेपान होते असे कोठेही म्हटलेले नाही, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

वरील विवेचनावरून आर्यांचा प्रश्न किती गहन आहे याची कल्पना यावी. त्यामुळे हा यक्षप्रश्न सध्या काही काळ बासनात ठेवून द्यावा असे काही विद्वानांचे मत आहे, परंतु नव्याने उपलब्ध झालेल्या पुरातत्त्वीय पुराव्यावरून या प्रश्नावर प्रकाश पडेल असे वाटते. प्रस्तुत ग्रंथात त्याचा ऊहापोह केला आहे.

**वैदिक आर्यांचे पूर्वज**

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून उत्तर सिंधुकालीन लोक हे वैदिक आर्य असण्याची. दाट शक्यता आहे, हे स्पष्ट होते. ते पशुपालन आणि शेती करीत असत, खेड्यात राहत, व्यापाराऐवजी वस्तूंचा विनिमय करीत. त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांना लोखंड माहीत नव्हते व त्यांच्या जवळ घोडा होता, आणि आऱ्याची चाके असलेल्या रथाला तो जोडीत असत. विशेष म्हणजे ते सप्तसिंधुच्या प्रदेशात इ.पू. २०००-१५०० या काळात राहत होते. तेव्हा उत्तर सिंधु संस्कृती म्हणजे ऋग्वेदकालीन आर्य संस्कृती हे समीकरण मान्य होण्यास प्रत्यवाय नसावा. हे गृहीतक मान्य केल्यास या पुढचा टप्पा म्हणजे त्यांचे, म्हणजे उत्तर सिधुचा आणि पर्यायाने वैदिक आर्यांच्या पूर्वजांचा मागोवा घेणे. पूर्वी 'एच्' स्मशानभूमी ही वैदिक आर्यांची असा समज होता आणि म्हणून मॉर्टिमर व्हीलर यांनी इंद्राला दोषी ठरविले होते; परंतु ती संस्कृती नागरी सिंधुची वारसदार आहे हे आता सिद्ध झाले आहे आणि नव्याने उपलब्ध झालेल्या पुरातत्त्वीय पुराव्यावरून त्यांच्या पूर्वजांचा इतिहास खूप मागे, म्हणजे इ.पू. ५००० पर्यंत मागे नेता येतो.

अलीकडे नव्याने केलेल्या हडप्पा येथील उत्खननात उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून तेथील वसाहतीच्या इतिहासाचे तीन सांस्कृतिक कालखंड पाडले आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

तेथे सर्वप्रथम वस्ती सिंधुपूर्व काळात (इ.पू. ३२००-२६००), झाली आणि त्यातून पुढे नागरी सिंधु निर्माण झाली (इ.पू. २६००-२०००), नागरी सिंधुचा हास इ.पू. २२०० च्या सुमारास सुरू झाला आणि त्यातून उत्तर सिंधु उदयास आली (इ.पू. २०००-१६००).

'एच्' ही स्मशानभूमी उत्तर सिंधुचाच एक भाग होती हे आता सिद्ध झाले आहे. उत्तर सिंधु ही ऋग्वेदकालीन आर्यांची संस्कृती। होती हे आपण पूर्वी साधार सिद्ध केले आहे, तेव्हा नागरी सिंधु आणि सिंधु पूर्व संस्कृती यासुद्धा आर्यांच्या संस्कृती होत्या हे ओघानेच

आता तेथे याहून आधीच्या रावी किंवा हाक्रा संस्कृतीचे अवशेष सापडल्याचे वृत्त आहे. आले. फक्त फरक इतकाच की ते वेदपूर्व आर्य होते. ऋग्वेदकालीन आर्यांचे ते पूर्वज होते. या निष्कर्षाला उपोद्बलक पुरावा मानववंशशास्त्राचा मानवी सांगाड्यांचा मिळतो. प्रा. केनेथ केनेडी यांनी सिंधु संस्कृतीच्या निरनिराळ्या कालखंडातील मानवी सांगाड्यांच्या शास्त्रीय पाहणीवरून काही महत्त्वाचे निष्कर्ष काढले आहेत. ते म्हणतात ' :

"नागरी सिंधु संस्कृतीचा ऱ्हास सुरू झाला त्यावेळी जर भारतात नवे लोक आले असते, तर 'एच' स्मशानभूमीतील मानवी सांगाड्यात ते दिसून आले असते. परंतु तसा पुरावा अजिबात उपलब्ध नाही. मेहेरगढ येथील उत्खनित पुराव्यावरून असे दिसून येते की, ९००० वर्षांपूर्वीपासून ते सुमारे ७००० वर्षांपर्यंत एकाच प्रकारचे लोक तेथे राहत होते. परंतु त्यानंतरच्या काळात मात्र इ.पू. ४५०० च्या आसपास कोणी नव्या लोकांचे भारतीय उपखंडात आगमन झाले, हे मानवी सांगाड्यांवरून स्पष्ट दिसून येते. तेच लोक पुढे इ.पू. १७५० पर्यंत म्हणजे उत्तर सिधुच्या अंतापर्यंत राहत होते. इ.पू. ८०० च्या सुमारास मात्र भारतात नव्या लोकांचे आगमन झालेले दिसते.

" या शास्त्रीय पुराव्यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही की, भारतीय उपखंडात इ.पू. ४५००-८०० या काळात आर्यांनी भारतावर स्वारी केली किंवा स्थलांतर केले, असा कोठलाही पुरावा नाही. असे जर असेल, तर मग पूर्व,

नागरी आणि उत्तर सिंधुचे लोक कोण होते ? ते आर्य होते या आपल्या गृहीतकाला त्यामुळे पुष्टी मिळते, म्हणजे ते गोरे होते का काळे होते, यापेक्षा ते इंडो-आर्यन भाषा बोलणारे होते असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. ती भाषा संस्कृत किंवा प्राकृत असावी असे आपण पूर्वीच सांगितले आहे. मानववंशशास्त्रज्ञांच्या मते ते हल्लीच्या पंजाबी आणि सिंधी लोकांसारखे दिसणारे होते. हेम्फील, लुकस आणि केनेडी हे तीन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मानववंश शास्त्रज्ञ आहेत. हडप्पा येथील नव्याने केलेल्या उत्खननात सापडलेल्या मानवी सांगाड्यांचा निरनिराळ्या शास्त्रीय कसोट्या लावून त्यांनी अभ्यास केला. त्यांचा निष्कर्ष अत्यंत महत्त्वाचा आहे.

"हडप्पा संस्कृतीचे लोक आणि इराणच्या पठारी प्रदेशातील आणि अति पूर्वेकडील भागात त्या काळात राहणारे लोक यांच्यात विलक्षण साम्य आहे, हे टेपे हिसार (इराण) या स्थळाच्या तिसऱ्या कालखंडातील (इ.पू. ३०००-२०००) पुराव्यावरून दिसून येते. त्यांच्यात दळणवळणही होते."

हडप्पा येथील नागर सिंधु स्मशानभूमी (आर ३७) आणि उत्तर सिंधु स्मशानभूमी (एच्) या दोन्हींतील मानवी सांगाड्यांत विलक्षण साम्य आहे, इतके की ते दोन्ही एकच लोक होते असे म्हणता येईल. त्यांच्यात आणि आजच्या सिधी आणि पंजाबी लोकांत असलेले साम्य लक्षात घेता, ते सिंधु संस्कृतीच्या लोकांचे वंशज असावेत असे मानववंशशास्त्रज्ञांचे मत आहे. एकंदरीत पुराव्याचा विचार करता सिंधु संस्कृतीचे लोक हे कोणी बाहेरून आलेले नसून वायव्येकडील प्रदेशात खूप पूर्वीपासून राहत असलेल्या लोकांचे ते वंशज होते, असे म्हणणे चूक ठरणार नाही. ह्या पुराव्याचा उपयोग करून आपल्याला सिंधु संस्कृतीच्या लोकांच्या पूर्वजांचा शोध घेणे मनोरंजक ठरेल.

नागरी सिंधु आणि उत्तर सिंधु या दोन संस्कृतींच्या लोकांचा अभ्यास केल्यास प्रचंड विरोधाभास जाणवतो. नागरी सिंधुचे लोक गडगंज श्रीमंत, तर उत्तर सिंधुचे महा-दरिद्री; एक मोठ्या आखीवरेखीव शहरात मोठाल्या आलिशान इमारतीत राहत, तर दुसरे खेडेगावात (त्यांचे वंशज) झोपडपट्टीत राहत असत. एकाची घरे पक्क्या विटांची, तर यांच्या झोपड्या कुडाच्या. एक वैभवशाली व्यापारी, तर दुसरे शेती, पशुपालनावर दिवस काढणारे. एक सुशिक्षित, तर दुसरे अडाणी. परंतु असे असले तरी त्यांच्यात काही समान दुवे होते. ते नागरी सिंधुकडून उत्तर सिंधुत वंशपरंपरागत आले.

**धर्म**

सिंधु संस्कृतीच्या लोकांच्या धार्मिक समजुतीसंबंधीचे आपले ज्ञान अत्यंत तोकडे आहे. एकतर सिंधु स्थळांची मोठ्या प्रमाणावर उत्खनने फार थोडी झाली आहेत, आणि जी झाले आहेत त्यातसुद्धा मंदिर म्हणता येईल अशी वास्तू जवळजवळ नाहीच. कदाचित अशीही शक्यता असेल की, आजच्याप्रमाणेच धर्म ही वैयक्तिक बाब असावी. हे हिंदु धर्माचे व्यवच्छेदक लक्षण म्हणावे लागेल. प्रत्येकजण आपल्या आराध्य दैवताची स्थापना घरातल्या एखाद्या कोनाड्यात करतो. हल्लीची मंदिरे तर सोडाच, पण प्राचीन काळातील खूप मोठाली मंदिरे पाहिली, तर त्यातील सभामंडपात शंभर माणसेसुद्धा बसण्याइतकी जागा नसते. उदा. खजुराहोचे कंडारीय महादेव मंदिर. याउलट मुसलमानांच्या मशिदीत किंवा ख्रिश्चन लोकांच्या चर्चमध्ये शेकडो माणसे एकाच वेळी जमून प्रार्थना करू शकतात. हिंदुधर्म असंघटित असल्यामुळे असे झाले असावे असे म्हणता येईल. याचे मूळ वैदिक काळापर्यंत मागे जाते. ऋग्वेदातसुद्धा मंदिर किंवा एखाद्या धार्मिक समजुतींशी निगडित इमारतीचा उल्लेख आढळत नाही. देव्हाऱ्यांचा उल्लेख ब्राह्मण ग्रंथात आढळतो. त्यापेक्षा अधिक काही नाही.

सिंधु संस्कृतीच्या धार्मिक समजुतीत अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे अग्निपूजा. ती केंद्रस्थानी होती, हे डॉ. शुभांगना अत्रे यांनी विशद करून सांगितले आहे. सिंधु मुद्रांवर एकशिंग्या प्राण्याचे किंवा बैलाचे चित्र सर्वाधिक दाखविले आहे. त्याच्या समोर एक पात्र असते, त्यांत अग्नी असतो; काही मुद्रांवर त्यातून ज्वाळा बाहेर पडताना स्पष्ट दिसतात अनेक ठिकाणी उत्खननात अग्निकुंडेही सापडली आहेत. कालीबंगन येथील बालेकिल्ल्यात सात अग्निकुंडे एकाला एक लागून होती. बनावली, राखी गढी, लोथल येथेही अग्निकुंडे सापडली आहेत. कालीबंगन येथील अग्निकुंडे लंबगोल आकाराची (सुमारे १ ०.५० मी. आणि ३० सें. मी. खोल) होती. त्यांच्या मध्यभागी एक दगडी गोटा उभा ठेवलेला होता. तो मातीने लिपलेला होता. तो १५ सें.मी. जाड आणि ३०-४० सें.मी. उंचीचा होता. सतत अग्नी तेवत राहिल्यामुळे तो भाजून अत्यंत कडक झालेला होता. त्याच्याभोवती भाजक्या मातीच्या त्रिकोणी, गोल (*biconvex)*

आकाराच्या केकसारख्या वस्तू होत्या. अग्निकुंडात सतत धग राहावी म्हणून त्यांचा उपयोग होत असावा. या अग्निकुंडांच्या पूर्वेला एक भिंत होती, म्हणजे पूर्वेकडे तोंड करून अग्निपूजा करता येत होती. परंतु येथे एक गोष्ट विशेष नमूद केली पाहिजे की, या प्रकारची अग्निकुंडे हडप्पा आणि मोहोंजोदारो येथे मात्र सापडली नाहीत. आजही भारतात निरनिराळ्या प्रदेशांत हिंदू धर्म एकच असला, तरी त्याचे स्वरूप आणि विधी निराळे आहेत. तोच प्रकार पाच हजार वर्षांपूर्वीही अस्तित्वात होता. कालीबंगन येथील अग्निकुंडे बालेकिल्ल्याच्या उत्तरेकडील भागात होती, तर तेथीलरहिवाशांची निवासाची सोय दक्षिणेकडील भागात होती. त्या भागात लहान खेड्यातीलअंगिठ्या सापडल्या आहेत आणि त्यांच्यापेक्षा अग्निकुंडे संपूर्णपणे निराळी आहेत. तीविटांच्या कट्ट्यावर बांधलेली होती. तेथे ती नागरी सिंधु काळापासून अस्तित्वात आली,तेव्हा या काळात आर्य भारतात आले असावेत असे रेमंड आल्चिन यांना वाटते. परंतुएकदा आर्य इ.पू. १५०० मध्ये भारतात आल्याचे मत पक्के झाल्यामुळे वेदपूर्व-काळातही काही आर्य मंडळी भारतात आली असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे त्यांना म्हणावे लागले.

कालीबंगन येथे अग्निकुंडांच्या आसपास आणखी काही अवशेष होते. तेही धार्मिक समजुतींशी निगडित होते. एका विटांच्या चौथऱ्यावर स्नानाची सोय होती. आणखी एक विहीर होती आणि तिच्याजवळ विटांचा कट्टा होता. जवळ एक यज्ञवेदी (१.२५०१मी) होती. ती चौकोनी आकाराची असून आतून मातीने लिपून घेतलेली होती. त्यात बैलाची हाडे आणि हरणाची शिंगे होती. त्यावरून तेथे पशुबळीची सोय होती, हे सिद्ध होते.
सिंधु मुद्रांवर पशुबळीची चित्रे आहेत, हे या संदर्भात ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

कालीबंगन येथील बालेकिल्ल्यातील पुराव्यावरून तेथील अवशेषांवरून – तेथे एखादे अग्निमंदिर असावे असा प्रा. ब्रिजबासी लाल यांचा तर्क आहे. ते लिहितात. "या मंदिरसंकुलात तेथील मुख्य पुरोहित आणि त्यांच्या बरोबर इतर पुरोहित हे विधिपूर्वक मिरवणुकीतून जात असावेत असे चित्र डोळ्यांपुढे उभे राहते. तेथील अग्निकुंडात ते अग्निपूजा साग्रसंगीत करीत असावेत. इतरेजन दक्षिणेकडील प्रवेशदारातून येत असतील."

कालीबंगन येथील सामान्यजनांच्या वस्तीत (*Lower Town)* जी घरे सापडली आहेत, त्यातसुद्धा अग्निपूजेचा पुरावा मिळतो. त्याच्या जवळ असलेल्या एका भागात *KLB III)* अशीच चारपाच अग्निकुंडे सापडली.

हडप्पा आणि मोहोंजोदारो येथे सापडलेल्या भाजक्या मातीच्या मूर्ती मातृदेवतेच्या असाव्यात याबद्दल विद्वानांत एकमत आहे. परंतु त्या भारतात (हल्लीच्या) सापडत नाहीत हे लक्षणीय आहे. त्यांच्या शिरोभूषणात छोटे दिवे असतात, त्यात काजळीही असते. त्या कुमारिकांच्या असून डोक्यावर पवित्र अग्नी नेत असाव्यात असे डॉ. शुभांगना अत्रे यांचे मत आहे. सिंधु स्थळांच्या उत्खननात जी जाळीदार भांडी सापडतात, तीसुद्धा अग्नी नेण्यासाठी असावीत असे त्या म्हणतात; कारण अग्नी हेसुद्धा मातृदेवतेचे एक रूप आहे. त्यांच्या मते कालीबंगन येथे अग्निपूजेचे कर्मकांड पूर्ण विकसित झालेले दिसते. तेथे लोकांच्या घराघरातून अग्निकुंडे तयार केली गेली. तेथे मातृदेवतेच्या किंवा कुमारिकांच्या मूर्ती अर्पण करण्याची प्रथा बंद पडली आणि बहुधा त्यामुळे राजस्थान आणि गुजरातमध्ये त्या सापडत नाहीत.

बनावली (हरियाणा) येथील उत्खननात एक गजपृष्ठाकृती आलेखाची, कच्च्या विटांची बांधलेली वास्तू उजेडात आली त्यात फक्त एक अग्निकुंड होते आणि त्यावरून ते अग्निमंदिर असावे हे सिद्ध होते. लोथल (गुजरात) येथे विटांची बांधलेली अग्निकुंडे सापडली. ती नागरी सिंधु आणि उत्तर सिंधु काळातील आहेत. बहुधा अग्निपूजा राजस्थानातून गुजरातमध्ये आली असावी. काही साध्या अंगिठीसारख्या खड्यात खणलेल्या असून गोलाकार आणि चौकोनी आहेत. त्यांच्या बाजू मातीने लिंपून काढलेल्या आहेत. त्यांना चुली म्हणता येणार नाही कारण त्यांच्यात जाळण्यासाठी लाकडे घालण्याची सोय नाही. लोथल येथील बालेकिल्ल्यातही अग्निकुंडे होती. त्यानंतर ती सामान्यजनांच्या घरात बांधली गेली. तेथे शहरात एक खूप मोठे, पक्क्या विटांचे बांधलेले अग्निकुंड २.७००२.४० मीटरचे होते. तेथे सार्वजनिक अग्निपूजा होत असावी यात शंका नाही (आ. ३.१६). बालेकिल्ल्यात मात्र सुरुवातीच्या काळात अग्निपूजा अस्तित्वात नव्हती.

ऋग्वेदकाळात अग्नी हा सर्वात श्रेष्ठ देव होता. त्याला अर्घ्य दिला जात असे आणि सोमरसही दिला जात असे. लोकांच्या घरात अग्निकुंडे होती. सिंधु संस्कृतीतही अग्निपूजा किती महत्त्वाची होती हे आपण पाहिलेच आहे.

वैदिक आर्यांचे पूर्वज / ९३

मोहोंजोदारो येथील उत्खननात एक वास्तुसंकुल सापडले. शहराच्या *HR* भागात ते होते. त्याचा एकंदर आलेख आणि आतील एकूण व्यवस्था पाहता, ते राहण्यासाठी वापरले जात नसावे असे वाटते. उलट ती वास्तू सार्वजनिक उपयोगाची असावी असे दिसते. तिचे बांधकाम अत्यंत सुबक असून काळजीपूर्वक केलेले होते. तिचा आकार चौकोनी असून मध्यभागी मोकळी जागा आहे व सभोवती दालने आहेत. आग्नेयेकडील कोपऱ्यापासून सुरुवात केल्यास असे दिसून येते की, एकाआड एक अशा प्रत्येक दालनात विटांचा कट्टा आहे. क्र. ३ च्या दालनात वर जाण्यासाठी जिना आहे. चारही कोपऱ्यात चौथरे आहेत. मधल्या भागात वर छप्पर नसावे. तेव्हा ही वास्तू म्हणजे घर नसून मंदिर असावे असा तर्क करणे चूक ठरणार नाही. त्याच्या पश्चिमेस आणि दक्षिणेस घरे होती आणि वायव्येस बाजार होता. वास्तूच्या मध्यभागी असलेल्या मोकळ्या जागेत बहुधा अग्निकुंड असावे. मुद्रांवर बैलाच्या किंवा एकशिंग्यापुढे जसे एक अग्निपात्र दिसते, तसे हे; पण खूप मोठे असावे. त्यामुळे पूजा करण्यासाठी वरच्या मजल्यावर जावे लागे, म्हणून प्रत्येक कोपऱ्यात जिना बांधलेला होता.

सिंधु मुद्रांवर जे अग्निपात्र दिसते त्याचे दोन भाग दाखविलेले असतात. वरचे भांडे अग्निसाठी आणि त्या खाली वाडग्यासारखा किंवा बशीसारखा भाग दिसतो, तो राख जमा करण्यासाठी असावा. अशा पात्रातून अग्नीची समारंभाने मिरवणूक काढीत असत असे मुद्रांवरील चित्रणावरून म्हणता येईल.

**पूर्व सिंधु संस्कृती**

ऋग्वेदातील काही परंपरा आपल्याला नागरी सिंधु संस्कृतीत आढळून येतात आणि त्यामुळे ऋग्वेदकाळ आणि उत्तर सिंधु असे समीकरण आपण मांडलेले असले, तरी त्यातील काही ऋचा नागरी सिंधु काळात रचल्या गेल्या असाव्यात असे म्हणणे चूक ठरणार नाही. इतकेच नव्हे, तर त्यांची प्राचीनता पूर्व सिंधु काळातही जाणे शक्य आहे. पूर्व सिंधुतून नागरी सिधुची निर्मिती झाली हे आता सर्वमान्य झाले आहे. पूर्वी केलेल्या कोटदीजी येथील उत्खननात पूर्व सिंधु आणि नागरी सिंधु यात खंड पडलेला होता असा पुरावा मिळाला होता. परंतु कालीबंगन, हडप्पा इत्यादी ठिकाणच्या उत्खनित पुराव्यावरून त्यांच्यात खंड नसून नागरी सिंधुच्या जडणघडणीत पूर्व सिंधुचा सिंहाचा वाटा होता, हे आता सिद्ध झाले आहे. ग्रामीण पूर्व सिंधुच्या अखेरच्या काळात (इ.पू. २६५०- २६००) झपाट्याने विकास होऊन तिची परिणती नागरी सिंधुत झाली यात शंका नाही.

पूर्व सिंधुचा शोध मॉर्टिमर व्हीलर यांनी हडप्पा येथे केलेल्या उत्खननात प्रथम लागला. नंतरच्या काळात या संस्कृतीची आजवर ४७१ स्थळे सापडली आहेत (आ. ४.२). त्यातील अनेक सरस्वतीच्या खालच्या खोऱ्यात आहेत. अनेकांचे उत्खनन झालेले असले तरी मोठ्या प्रमाणावर मात्र एकाचेही नाही. त्यांच्या विस्तारावरून असे वाटते की ही साधारणपणे मोठाली खेडी (गावे) होती, त्यांचा विकास होऊन पुढे त्यांची नगरे उदयास आली. सरस्वती नदी त्या काळात (इ.पू. ३२००-२६००) दुथडी भरून वाहत होती त्यामुळे व भरभराटीस आलेल्या व्यापारामुळे नागरीकरण सुलभ झाले. सरस्वतीचे खालचे खोरे आता रखरखीत वाळवंट आहे.

कालीबंगन येथील उत्खननात पूर्व सिंधुचे काही पैलू नव्याने उजेडात आले. तेथील वसाहत थोडीफार आखीवरेखीव होती. ती आकाराने समभुज चौकोनाच्या आकाराची होती आणि तिला कच्च्या विटांची तटबंदी होती. लोकांची घरेही कच्च्या विटांची होती आणि विटांचा आकार ३:२:१ (३०० २० x १० सें.मी.) असा प्रमाणबद्ध होता. त्यातूनच पुढे ४:२:१ हा आकार नागरी सिंधु काळात विकसित झाला. मुख्य पीक बार्ली किंवा सातु आणि काही प्रमाणात गहू, शेळ्या-मेंढ्या आणि गायी-गुरे -गुरे ते ते। पाळीत. त्याच्या जोडीला थोडी शिकार आणि मासेमारी होती. तंदूरसारख्या जमिनीखालच्या चुलीत रोट्या भाजल्या जात. या काळातील एक शेत कालीबंगन श्रीबंगन येते सापडले. त्याची नांगरट हल्लीच्या शेता सारखीच होती. याचे कारण नांगर एकाच प्रकारचा होता. बनावली येथे नांगराच्या सापडलेल्या मातीच्या प्रतिकृती आणि हल्ली तेथे वापरात येणारा नांगर एकाच आकाराचा आहे. तेव्हा तो लाकडाचा असावा हे उघड आहे. तो आजच्याप्रमाणेच खैराच्या (*Acacia catecu*) लाकडाचा असावा. खैराचे लाकूड अत्यंत टणक आणि टिकाऊ असते. कालीबंगन येथील पूर्वसिंधु वसाहत भूकंपात उद्ध्वस्त झाल्याचा पुरावा आहे.

**हाक्रा संस्कृती (इ.पू. ३८००-३२००)**

पाकिस्तानात सरस्वती नदीला हाक्रा असे नाव आहे. त्यामुळे तेथे सापडलेल्या सिंधु पूर्व संस्कृतीला 'हाक्रा' संस्कृती असे नाव गेले आहे. डॉ. रफिक मोगल यांनी तेथे चोलीस्तानच्या वाळवंटात केलेल्या अन्वेषणात ही संस्कृती उजेडात आली. तेथे बहावलपूर जिल्ह्यात या संस्कृतीची शंभराहून अधिक स्थळे त्यांनी शोधून काढली आहेत. हडप्पा येथील स्थळे सर्वप्रथम या संस्कृतीची होती. भारतातही काही सापडली आहेत.

पाकिस्तानात हडप्पा आणि जलीलपूर आणि भारतात कुणाल (हरियाणा) येथील 'हाक्रा संस्कृती'च्या वसाहतींचे उत्खनन झाले आहे, तर काही ठिकाणी चालू आहे (आ. ४.३).

आर्यांच्या शोधात / ९६

'हाक्रा संस्कृती' ही ग्रामीण संस्कृती होती. मातीच्या आणि कुडाच्या भिती असलेल्या झोपड्यात किंवा गर्तावासात (खड्यातील घरे) लोक राहत असत. लाकडी वाशांवर छत उभारले जाई. थोडीफार शेती, पशुपालन आणि क्वचित शिकार आणि मासेमारी यांवर लोक गुजराण करीत. तांबे त्यांना माहीत होते. ते अलंकारासाठी (मणी, बांगड्या वगैरे) आणि हत्यारांसाठी (तीराग्रे, मासेमारीचा गळ) वापरीत. परंतु तांबे दुर्मीळ होते. त्यामुळे हाडांची हत्यारे बनवीत .

'हाक्रा संस्कृती'चे लोक हे सरस्वतीच्या खोऱ्यातील आद्य वसाहतकार होत. त्यांच्या काही भांड्यांचे घाट, त्यावरील नक्षी यांचे सिंधु संस्कृतीच्या भांड्यांशी विलक्षण साम्य *3* आहे. 'हाक्रा संस्कृती'चे लोक हे ऋग्वेदातील पंचजन असावेत असे वाटते. ते सिंधुच्या खोऱ्यातून सप्तसिंधुच्या प्रदेशात आले. यदु तुर्वश आणि अनु-द्रुह्य आणि त्यांचे पुढारी पुरु, ही मंडळी सरस्वतीच्या खोऱ्यातील आद्य वसाहतकार होती. मायकेल विट्झेल लिहितात की, ऋग्वेदाचे सातवे मंडल म्हणजे निखळ इतिहास आहे. भरतांचे सिंधु पार करून पंजाबमध्ये आगमन आणि त्यांची पंचजनांशी झालेली लढाई हा इतिहासच आहे. यदु आणि तुर्वश हे बहुधा ह्या संस्कृतीचे लोक असावेत. ते वैदिक आर्य नव्हते आणि खूप दुरून आलेले होते (ऋ. १.३६.१८; ६.४५.१). त्यांना समुद्र आणि पूर आलेल्या नद्या पार करून यावे लागले होते (ऋ. ६.२०.१२; १.१७४.९; ४.३०.१७).

**मेहेरगढ**

'हाक्रा संस्कृती'ची व्याप्ती प्रामुख्याने सरस्वतीच्या खालच्या खोऱ्यात, पश्चिमेकडच्या भागात होती. तेथे सिंधु आणि सरस्वती या दोन्ही नद्या जवळजवळ आहेत. 'हाक्रा संस्कृती'चा उगम सिंधुच्या खोऱ्यात झाला हे मेहेरगढ येथील उत्खननावरून स्पष्ट होते. किले गुल महमंद येथेही त्याचा पुरावा मिळतो. मेहेरगढ हे क्वेट्याजवळ (बलुचिस्तान), बोलन नदीच्या तीरावर, बोलन खिंडीच्या तोंडाशी वसलेले आहे. तेथे खूप विस्तीर्ण प्राचीन वसाहत होती. फ्रेंच पुरातत्त्वज्ञ जारीज यांनी तेथे दीर्घकाळ उत्खनन करून महत्त्वाचे अवशेष उजेडात आणले आहेत. तीनशे हेक्टर भूभागावर पसरलेल्या या प्राचीन स्थळी निरनिराळ्या कालखंडांत निरनिराळ्या भागांत मानवी वस्ती इ.पू. ७५००-२५०० या काळात झाली. सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी तेथे प्रथम स्थिर जीवन सुरू झाले. पहिले दोन कालखंड नवाश्मयुगीन असून पहिल्या कालखंडात खापरे वापरात नव्हती, ती दुसऱ्या कालखंडात आली. ती हाताने घडविलेली होती. त्यानंतर वसाहतीत खंड पडला. तिसऱ्या कालखंडात नवीन लोक तेथे आले आणि नंतर इ.पू. २५०० पर्यंत सतत वस्ती होत राहिली.

**१. आद्य नवाश्मयुग (इ.पू. ७०००-६०००)**

पश्चिम आशियात प्रथम मानवी वस्ती १०,००० वर्षांपूर्वी झाली आणि थोड्याच काळात शेतीचे लोण भारतीय उपखंडात येऊन पोहोचले. भारत-इराण-अफगाणिस्तान यांच्या सीमावर्ती प्रदेशात जंगली प्राणी आणि बार्ली आहे. प्राण्यांना माणसाळवून त्यांची निपज करणे आणि गहू बार्लीची लागवड करणे हे मानवाला थोड्या काळात शक्य झाले. अफगाणिस्तानातील बाल्ख (प्राचीन वाल्हिक देश आणि ग्रीकांचा बॅक्ट्रिया) प्रांतात अक् कुप्रुक आणि तेथील काही नैसर्गिक गुहांतून याचा पुरावा उपलब्ध झाला आहे. मध्याश्मयुगीन शिकारी हे शेतकरी आणि पशुपालक, गोपजन झाले

मेहेरगढ येथील पहिल्या कालखंडातील लोकांची घरे कच्च्या विटांची होती. काही विटांचा आकार २८०१४.५७ सें.मी. होता. हेच प्रमाण पुढे पूर्व सिंधु काळात चालू राहिले आणि शेवटी नागरी सिंधु काळात ४:२:१ असे

पक्के झाले. त्यांच्याजवळ खापराची भांडी नव्हती, परंतु विणलेल्या टोपल्या होत्या. त्या आतून लिपून काढीत. घरात चुली असत आणि लहान चौक विटांनी बांधून त्यात धान्यांची साठवण करीत. घरात पाटे-वरवंटे होते, शंखाच्या बांगड्या आणि कॅलसाईट, लॅपिस लाझुली आणि टरकॉईझचे मणी ते तयार करीत.

या काळातील लोक पोटापुरती शेती करीत. मुख्य पीक बार्ली, त्या मानाने गहू कमी. शेळ्या-मेंढ्या, गायी-बैल पाळीत. शिकारही करीत. हरिण, डुक्कर, जंगली गाढव यांची हाडे उत्खननात सापडतात. या प्रदेशात जंगली मेंढी-शेळी आणि बैल होते. त्यांना माणसाळवण्यात आले. या काळात वर्षातून फक्त काही काळ येथे मानवी वस्ती असण्याची दाट शक्यता आहे.

**२. उत्तर नवाश्मयुग (इ.पू. ६०००-५०००)**

आद्य नवाश्मयुग दीर्घकाळ टिकले. त्यानंतरच्या उत्तर पुराश्मयुगात मातीची भांडी हाताने घडविण्यात आली, घरे कच्च्या विटांची असत. या काळात सिंचनाची सोय उपलब्ध झाली. सुरुवातीस बार्ली आणि गहू यांची शेती मोठ्या प्रमाणावर झाली. या काळातील अनेक (१६६) मानवी दफने उत्खननात सापडली. त्यापैकी ८५ आद्य नवाश्मयुगीन म्हणजे पहिल्या कालखंडातील आणि बाकीची उत्तर नवाश्मयुगीन होती. शव खड्यात पुरण्यापूर्वी त्याच्या बाजूस छोटी भिंत बांधीत. शरीर एका कुशीवर पाय आखडून ठेवीत. परंतु खड्यात भांडी ठेवीत नसत. शवाच्या गळ्यात मण्यांच्या माळा घालीत. पुरुषांच्या प्रेताबरोबर त्यांची हत्यारे ठेवीत. लहान मुलांचेही दफन करीत. या मानवी सांगाड्यांच्या अभ्यासावरून ते यूरोपियन लोकांपेक्षा वेगळे होते, असे शास्त्रज्ञ सांगतात.

**३. टोगाओ संस्कृती (इ.पू. ४५००-३८००)**

हा कालखंड भारतीय उपखंडाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा होता. नवाश्मयुगीन लोकांची मेहेरगढ येथील वस्ती तेथील लोक सोडून गेल्यानंतर तेथे काही काळ वस्ती झाली नाही. इ.पू. ४५०० मध्ये जे लोक तेथे आले त्यांची संस्कृती समृद्ध होती आणि त्यांनी अनेक नवीन गोष्टी आपल्याबरोबर आणल्या.

या काळात प्रथम कुंभाराचे चाक अस्तित्वात आले. त्यामुळे अत्यंत सुबक आणि घाटदार भांडी घडविण्यात आली. रंगीत नक्षीने ती सजविली गेली. लाल रंगांच्या भांड्यांवर काळ्या रंगातील चित्रे अतिशय मनोहरी दिसतात. तसेच तांब्याचा वापर प्रथम सुरू झाला, आणि विशेष म्हणजे मातृदेवतांच्या भाजक्या मातीच्या मूर्ती तयार करण्यात आल्या. उत्खननात कुंभाराचा आवाही सापडला आहे. तांब्याचे अलंकार आणि हत्यारे व रंगीत दगडांचे मणी तयार करीत असत. शेजारील देशांशी त्यांचा व्यापार सुरू झाला. लोकांची घरे कच्च्या विटांची, अनेक खोल्यांच, असत. घरात हल्लीच्या तंदूरसारखी- असे. पुढे सिंधु संस्कृतीच्या काळात ती वापरात होती आणि आजपर्यंत पंजाब-हरियाणात उपयोगात आहे.

विटांचा आकार हळूहळू ४:२:१ या प्रमाणात उत्क्रांत होत होता. या काळातील वस्ती ७५ हेक्टरवर पसरलेली होती. शेती भरभराटीला आली होती. बार्ली प्रमुख पीक असले तरी गव्हाच्या तीन-चार जातींची लागवड होत असे. उद्योगधंदाही बऱ्यापैकी भरभराटीस आला होता. गोमेद, अकीक, गार्नेट, लॅपिझ, टरकॉईझ इत्यादी दगडांचे मणी तयार करीत, त्याला छिंद्र पाडण्यासाठी दगडी ड्रील वापरीत. तांबे वितळवण्यासाठी मातीच्या मुशी होत्या. हेच तंत्रज्ञान पुढे सिंधु काळात विकसित झाले. व्यापारात झपाट्याने वाढ होऊन नागरीकरण सुलभ झाले. सिंधु संस्कृतीची मुळे या 'टोगाओ संस्कृती'त दिसतात.

या कालखंडातील सर्वात महत्त्वाचा पुरावा मानवी सांगाड्यांचा आहे. तेथील १२५ दफनांपैकी ९९ दफनांचे उत्खनन केले आहे. या काळातील स्मशानभूमी वसाहतीपासून थोड्या दूर अंतरावर होती. या काळातील दफन पद्धती पूर्वीपेक्षा निराळी होती. पूर्वी शवाच्या अंगाला लाल गेरू फासला जात असे, परंतु ती पद्धत आता सोडून दिली गेली. तसेच दफनाच्या बाजूला भिंत बांधणेही बंद झाले, शव खड्यात पूर्व-पश्चिम, परंतु डोके पूर्वेकडे करून ठेवीत. ते एका कुशीवर, पोटापाशी पाय दुमडून ठेवले जाई. या काळातही काही दफनात एकाहून अधिक सांगाडे सापडले. ते बहुधा एकाच कुटुंबाचे असावेत. घरात मृत्यू झाल्यानंतर जुन्या खड्ड्यात आधीच्या शवांबरोबर दफन केले जात असावे. काही दफनात फक्त अस्थी पुरलेल्या होत्या. त्यात शिरही होते. मृताच्या गळ्यात मरणोत्तर जीवनात उपयोगी पडावे म्हणून

भांड्यात अन्नपाणी ठेवीत. टोपल्याही आढळतात. तसेच मृताची हत्यारे काही दफनात ठेवलेली होती. विधिपूर्वक दफन करताना प्राणीही बळी दिले जात.

या तिसऱ्या कालखंडात लोकसंख्येत लक्षणीय वाढ झालेली दिसते. तसेच सांस्कृतिक विकासही नजरेत भरण्यासारखा झाला, असे भौतिक अवशेषांवरून म्हणता येईल. शेजारच्या प्रदेशांशी व्यापार वाढल्यामुळे सुबत्ता आली होती. येथून पुढे झपाट्याने विकास होऊन त्याची परिणती सिंधु संस्कृतीत झाली. ही 'टोगाओ संस्कृती' समृद्ध होण्याचे आणखी एक कारण म्हणजे या काळात नवे लोक मेहेरगढ येथे आले. याचा भक्कम पुरावा मानवी सांगाड्यांवरून मिळतो. आधीच्या नवाश्मयुगीन लोकांत आणि 'टोगाओ संस्कृती'च्या लोकांत शारीरिकदृष्ट्या लक्षणीय फरक होता असे मानववंशशास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखविले आहे. हेम्फिल, लुकस आणि केनेडी या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या मानववंशशास्त्रज्ञांनी हडप्पा येथील नागरी सिंधु आणि 'टोगाओ संस्कृती'चे लोक यांच्यात लक्षणीय साम्य असल्याचे दाखवून दिले आहे. तसेच त्या काळातील शेजारच्या इराणमधील लोकांत आणि त्यांच्यात फारसा फरक नव्हता. भारतीय उपखंडात प्राचीन काळात फक्त दोनदा बाहेरून नवे लोक आल्याचा पुरावा आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे. प्रथम इ.पू. ४५०० च्या सुमारास, ज्याचा पुरावा 'टोगाओ संस्कृती'त मिळतो, आणि दुसरा इ.पू. ८०० मध्ये. हे दोन पुरावे सोडले तर प्राचीन काळी भारतातील लोकसंख्या दीर्घकाळ एकसंध होती, असे ते सांगतात. मेहेरगढ़. येथे इ.पू. ४५०० च्या सुमारास जे नवे लोक आले त्यांच्या दातांची ठेवण विशिष्ट प्रकारची, आधीच्या नवाश्मयुगीन लोकांपेक्षा वेगळी होती, असे या विषयाचे तज्ज्ञ प्रा. लुकस यांना आढळून आले. त्यांच्या दाढेतील खोलगट भाग विशिष्ट प्रकारचा होता. त्याला '*Carabelli's cusp*' असे नाव आहे. अशा प्रकारची दाढेची ठेवण हल्लीच्या (आणि प्राचीन) युरोपियन लोकांत आढळते. दक्षिण आशियातही काही लोकात ती आहे. हा पुरावा निर्णायक असून शास्त्रशुद्ध आहे आणि त्यावरून निष्कर्ष काढता येतो तो हा की, 'टोगाओ संस्कृती'चे लोक हे बाहेरून म्हणजे शेजारच्या अफगाणिस्तानातून इ.पू. ४५०० च्या सुमारास भारतीय उपखंडात आले असावेत. परंतु प्रा. ग्रेगरी पोसल यांना हे मत मान्य नाही. त्यांच्या मते मेहेरगढ येथील वसाहतीत नवाश्मयुगापासून कोठेही खंड न पडता मानवी वस्ती इ.पू. २५०० पर्यंत चालू राहिली. परंतु मानवी सांगाड्यांच्या शास्त्रीय पुराव्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या पुढची कडी म्हणजे ज्या मानववंशशास्त्रज्ञांनी ही विधाने केली आहेत, ते पुढे असे म्हणतात की, हे नवे आलेले लोक आर्य नव्हेत; ते पुढे इ.पू. १०००-८०० च्या सुमारास आले. कितीही नवा विश्वसनीय पुरावा मिळाला, तरी युरोपियन विद्वान आर्यांना इ.पू. १००० च्या मागे फारसे जाऊन द्यायला तयार नाहीत. सिंधु संस्कृती द्राविडी होती या मताला ते ठाम चिकटून आहेत. त्याचे एक कारण असे की, एका विद्वानाने इ.पू. चौथ्या सहस्रकात इलामाईट ही द्राविडी भाषा बोलणारे लोक भारतात इराणच्या दक्षिण भागातून आले, असे विधान केले आहे. विशेष हे की ही इलामाईट लिपी अद्यापि वाचली गेलेली नाही.

या संदर्भात भारतातील अलीकडे केलेल्या उत्खनित पुराव्याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. गंगेच्या खोऱ्यातील काही प्राचीन स्थळांचे उत्खनन प्रा. (कै.) गोरधनदास शर्मा यांनी अलाहाबाद विद्यापीठातर्फे केले. तेथे बेलन नदीच्या खोऱ्यात (जि. मिर्झापूर, उत्तर प्रदेश) त्यांना पुराश्मयुगापासूनचे अवशेष सापडले. त्यापैकी महादाह येथे मध्याश्मयुगीन दफने आणि सराई नहर राय येथे प्रथम स्थिर मानवी वस्ती आठ हजार वर्षांपूर्वी झालेली आढळून आली. महादाह येथील दफनातील लोक खूप उंच आणि बलदंड होते. पुरुषांची उंची १.९२ मी. आणि स्त्रियांची १.७२ मी. होती. त्यांची नाके रुंद होती. डॉ. लुकस यांनी मेहेरगढ येथील आणि गंगेच्या खोऱ्यात सापडलेले मानवी अवशेष यांची सखोल तपासणी केली आहे, तेव्हा त्यांचे मत ध्यानात घेणे आवश्यक आहे. ते म्हणतात की मेहेरगढ येथील पहिल्या दोन कालखंडांतील नवाश्मयुगीन लोकांचे शेजारील इराणी लोकांशी साम्य नव्हते, तर उलट गंगेच्या खोऱ्यातील समकालीन लोकांशी काही समानता होती. यातून एक निष्कर्ष असा काढता येईल की, दहा हजार वर्षांपूर्वी सिंधुपासून गंगेपर्यंत एका विशिष्ट प्रकारचे लोक राहत होते. परंतु या संबंधात अधिक भक्कम पुराव्याअभावी निष्कर्ष काढणे धोक्याचे आहे. उपलब्ध पुराव्यावरून असे दिसून येते की, इ.पू. ५०००-४५०० च्या दरम्यान काही नवीन लोक बहुधा शेजारच्या अफगाणिस्तानच्या प्रदेशातून आले आणि त्यांनी मेहेरगढ, किले गुल महंमद, गुमला इत्यादी ठिकाणी वस्ती केली. काही आधीच्या नवाश्मयुगीन लोकांचे वंशज त्यांच्यात सामावून गेले. हेच लोक सिंधु संस्कृतीच्या लोकांचे पूर्वज होत.

या लोकांची भाषा इंडो-आर्यन (संस्कृतसारखी) असावी आणि त्यातून पुढे नागरी सिंधु काळात ती विकसित झाली. झोरोअॅस्ट्रियन लोकांचा (प्राचीन इराणी लोकांचा) धर्मग्रंथ अवेस्ता हा त्यांचा ऋग्वेदच समजण्यास हरकत नाही, कारण ऋग्वेद आणि अवेस्ता यांच्यात भाषेच्या दृष्टीने विलक्षण साम्य आहे. अवेस्ताचा काळ इ.पू. १०००- ६०० असा समजला जातो. परंतु आता तो इ.पू. १४०० पर्यंत मागे जाऊ शकेल असे काही विद्वानांना वाटते. सप्तसिंधुच्या खोऱ्यात इ.पू. ४५००-१००० पर्यंत कोणीही नवे लोक आले नाहीत. तेव्हा इराणमधील इलामाईट किंवा द्राविडी भाषा बोलणारे लोक भारतात आले नाहीत हे स्पष्ट होते. अवेस्तातील पुरावा तर बरोबर याच्या उलट आहे. त्यात इंडो-इराणीयन हे भारतातून इराणमध्ये गेल्याचे स्पष्ट सांगितले आहे. वेंदिदादच्या पहिल्या भागात (फरगर्द) त्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यात इंडो-इराणी लोकांची त्यांच्या मूळ स्थानापासून इतरत्र कोठेकोठे स्थलांतरे झाली हे सांगितले आहे. त्यांचा पुढारी अहूर माझदा याने याने ती ती केली होती. स्थलांतर करण्याचे मुख्य कारण म्हणजे आंग्र मैन्यु हा दैत्य अहूर माझदाने निर्माण केलेल्या ठिकाणी पर्यावरण प्रतिकूल करून ते राहण्यास अयोग्य करीत असे. त्यामुळे इंडो-इराणी लोकांना स्थलांतर करणे भाग पडे. त्यांचे आद्य मूलस्थान और्यानाम् वेजो होते. भयानक थंडी आणि हिमपात झाल्यामुळे त्यांना ते सोडावे लागले.

अवेस्तामध्ये अहूर माझदाने इंडो- इराणी लोकांना आपल्याबरोबर कोठे कोठे नेले त्याची यादी दिलेली आहे. त्यातील आपल्या प्रस्तुत अभ्यासाच्या दृष्टीने पंधरावे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. ते आहे हप्तहिंदू, म्हणजे अर्थातच सप्तसिंधुः तेथून ते पुढे इराणमध्ये गेले आणि कायमचे तेथे राहिले. या संदर्भात ऋग्वेदातील दास हे इराणमधील 'दाह' होत हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. त्यांचा अवेस्तात उल्लेख येतो. वायव्येकडच्या प्रदेशात, सुवास्तु (हल्लीची स्वात) नदीच्या खोऱ्यात त्यांची 'पुरे' होती. शंबर त्यांच्या मुख्य. इंद्राने त्यांची अशी ९९ पुरे उध्वस्त केली होती, हे पूर्वी सांगितलेच आहे. ही 'पुरे' तटबंदीयुक्त होती. अफगाणिस्तानातील उत्खननात टोगोलोक-२१ आणि दशली-३१ येथे त्या प्रकारच्या वसाहतीत सापडलेल्या आहेत असे आस्को पारपोला सांगतात. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणे ते 'गबरबंद' असावेत असे वाटते. डोंगराच्या उतारावर छोटे बंधारे बांधून छोट्या तुकड्यात ते शेती करीत आणि राहतही असत.

अहूर माझदाने निर्माण केलेले और्यानाम् वेजो (इराणवेज) म्हणजे पृथ्वीवरील जणू स्वर्ग होता. परंतु आंग्र मैन्यु या दैत्याने दहा महिने भयानक थंडी तेथे निर्माण करून,बर्फमय करून इंडो-इराणी लोकांना ते सोडावयास भाग पाडले. ही 'स्वप्नभूमी' नेमकी होती कोठे हा कळीचा प्रश्न आहे. लोकमान्य टिळकांच्या मते ते उत्तर ध्रुवाच्या प्रदेशात होते. काहींना ते रशियात किंवा ऑक्सस (अमुदर्या) या ठिकाणी असावे असे वाटते. परंतु हल्लीचा अफगाणिस्तानातील आरियाना प्रदेश म्हणजे और्यानाम् वेजो असण्याची दाट शक्यता आहे. तसे पाहिल्यास आपल्याकडील हरियाणा त्याच्याशी अधिक जुळतो. एकंदरीत पुरातत्त्वीय पुराव्याची छाननी केल्यास उत्तर सिंधु संस्कृतीचे लोक हेच वैदिक आर्य असावेत असा निष्कर्ष काढता येतो. त्यामुळे नागरी सिंधु आणि पूर्व सिंधु हे लोक वेदपूर्वकालीन आर्य म्हणता येईल. इतकेच नव्हे, तर 'हाक्रा' आणि 'टोगाओ' संस्कृतीचे लोकही त्यांचे पूर्वज म्हणावे लागतील. या संदर्भात काही वर्षांपूर्वी आर्याच्यावर पहिला ग्रंथ लिहिणारे गॉर्डन चाईल्ड यांचे उद्गार किती बरोबर होते याची आठवण होते. ते लिहितात : 'ऋग्वेदाची रचना करण्यापूर्वी खूप आधी आर्य भारतात येऊन राहिलेले होते आणि त्यामुळे त्यांना त्यांच्या मूलस्थानाची आठवण राहिलेली नव्हती.'

**आर्यांचे मूळ वसतिस्थान**

आर्यांच्या मूळ वसतिस्थानाची भारतीय आणि इंडो-इराणी परंपरेतील माहिती यात विलक्षण साम्य आहे. भारतीय परंपरेनुसार आर्यांच्या मूळ वसतिस्थानाच्या ठिकाणी खूप पाऊस पडून प्रलय झाल्यामुळे त्यांना त्यांचा पुढारी मनु वैवस्वत याने सप्तसिंधुच्या प्रदेशात आणले म्हणून मनु आर्यांचा पहिला राजा समजला जातो. अवेस्तात सांगितल्याप्रमाणे और्यानाम वेजो हे भयानक थंडी आणि हिमपातामुळे इंडो- इराणी लोकांना सोडावे लागले. त्यांचा पुढारी विवन्हवंतचा (वैवस्वत) पुत्र यिम होता आणि तो आर्यांचा राजा होता. तेथेही 'प्रलय' हा शब्द योजला आहे. त्याचा अर्थ महापूर किंवा प्रचंड हिमपात असाही होतो हे लो. टिळकांनी दाखवून दिले आहे. तसेच 'विवन्हवन्त' हे वैवस्वत शब्दाचे प्राचीन इराणी रूप आहे हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही. जसे उदा. असुर-अहूर.

आर्य प्रथम और्यानाम् वेजोडून सुवास्तु (स्वात) नदीच्या खोऱ्यात आले. ऋग्वेदातील एका ऋचेत (अग्निपूजक सप्तर्षिनी सुवास्तु नदी जिंकल्याचा उल्लेख आहे. तेथे दुर्गहचा नातू आणि पुरुकुत्सचा पुत्र त्रसदस्यु याचा अंमल होता. नंतर आर्य सुवास्तुच्या खोऱ्यात ते स्थिरावले, असे ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलांत सांगितले आहे. तेथून ते काश्मीर (मंडल२) आणि पुढे बियास सतलज खोऱ्यात (मंडल३) आणि शेवटी सरस्वतीच्या खोऱ्यात कुरुक्षेत्राच्या आसपासच्या प्रदेशात स्थिरावले (मंडल ९). भारतीय आणि इराणी परंपरेत एक महत्त्वाचा फरक आहे. इराणी परंपरेनुसार और्यानाम् वेजोमध्ये दहा महिने कडक थंडी आणि फक्त दोन महिने उन्हाळा होता. परंतु ऋग्वेदातील एका ऋचेत 'सूर्योदयापूर्वी खूप काळ लोटला आहे' असा उल्लेख आहे." या ऋचेकडे लोकमान्य टिळकांनी प्रथम लक्ष वेधले. असे जर असेल तर और्यानाम् वेजो नेमके कोठे असेल याचा शोध घ्यावा लागेल. सहा महिने सूर्यप्रकाश (दिवस) आणि सहा महिने अंधार (रात्र) असा तो प्रदेश असला पाहिजे. त्यामुळेच टिळकांनी ते आर्विटक (उत्तर ध्रुवीय) प्रदेशात असावे असे अनुमान केले.' त्यांच्या 'ओरायन' या ग्रंथात त्यांनी खगोलशास्त्राच्या पुराव्याच्या आधारे वेदाचा काळ इ.पू. ४५००असा निश्चित केला होता. प्रस्तुत ऋचेच्या (७.७६.२) आधारे आर्यांचे मूळ वसतिस्थान आर्विटक प्रदेशात असावे असे त्यांनी प्रतिपादन केले. टिळकांच्या या विधानावर उलटसुलट बरीच टीका झाली, परंतु काहींना त्यांचे मत ग्राह्य होते.

आता प्रश्न असा उभा राहतो की और्यानाम् वेजो हे जे आपण अफगाणिस्तानातील अरियाना असावे असा तर्क केला आहे, ते आर्यांचे मूलस्थान असावे का? याचे मुख्य कारण असे की ऋग्वेदातील पुराव्यावरून त्यांच्या मूलस्थानी दीर्घकाळ रात्र आणि दीर्घकाळ दिवस होता. तेव्हा ते अफगाणिस्तानात असणे शक्य नाही. आश्चर्याची गोष्ट ही की या ऋचेकडे बहुतेक विद्वानांचे लक्ष गेलेले दिसत नाही. लोकमान्य टिळकांनी त्याकडे लक्ष वेधले असतानासुद्धा ती ऋचा गैरसोयीची वाटत असल्यामुळे बहुधा हे झाले असावे. तेव्हा आर्यांचे मूलस्थान खूप उत्तरेकडे कोठेतरी असावे, जेथे दीर्घकाळ रात्र आणि दिवस असतात. महाभारतात आर्यांचे मूलस्थान मेरू पर्वतीय प्रदेशात असल्याचा उल्लेख आहे. ही केवळ कविकल्पना असावी असे काहींना वाटते. ऋग्वेदात मेरू पर्वताचा स्पष्ट उल्लेख नसला, तरी पार्जिटर यांच्या मते एका ऋचेत तसे सूचित केले आहे." ती खालीलप्रमाणे आहे.

*यस्य मे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रम् रसय सहौः।*
*यस्ये माः प्रदिशो यस्य बहु कस्मैदेवाय हविषा विधेम।। (१०.१२१.४)*

हे हिरण्यगर्भ सूक्त आहे. त्यात पृथ्वीच्या उत्पत्तीची कथा आहे. त्यातील बर्फाच्छादित पर्वत कोणता असावा याबद्दल विद्वानांत एकमत नाही. तो मध्य आशियातील मार्गियाना असावा असे एक मत आहे. अवेस्तात त्याचा मौरा आणि कोरीव लेखात मर्ग असा उल्लेख आहे. तुर्कमेनिस्तानातील मर्व्ह या प्राचीन नगरीच्या आसमंतातील प्रदेश तो हाच. परंतु येथेही दीर्घकाळ रात्र-दिवस नसतो. त्यामानाने पुराणातील पुरावा थोडा स्पष्ट आहे. तेथे चार डोंगर (पर्वत) असल्याचे सांगितले आहे. डॉ. हर्षे यांना पुराणातील मेरू म्हणजे उत्तरेकडे असणाऱ्या हेमकूट आणि निषाद यांच्यातील पर्वतराजी, जिला सध्या कुन-लुन आणि तिएन्-शान असे नाव आहे, ती असावी असे वाटते. त्यांच्या उत्तरेला अल्ताई पर्वत आहे. पुराणातील परंपरेनुसार तिबेटच्या सरहद्दीवरून हिमालयाच्या उत्तरेस हेमकूट पर्वत आहे, त्याच्या उत्तरेस निषाद आहे. तेव्हा अल्ताई दाग हा मेरू पर्वत असण्याची दाट शक्यता आहे. तो मंगोलिया आणि सैबेरियाच्या पश्चिमेस असून मंगोलियन भाषेत अल्ताई दाग म्हणजे 'सोन्याचा पर्वत' असा अर्थ होतो आणि पुराणातही मेरू पर्वत सोन्याचा होता असे वर्णन आहे. पद्म पुराणात (१.३.२६) त्याला 'कनक-पर्वतः' म्हटले आहे आणि हेमाद्रिने त्याचा कनकगिरी असा उल्लेख केला आहे. वायु पुराणातही (५.८०) असाच उल्लेख आहे व तुर्की भाषेत तोच अर्थ आहे

मेरू पर्वताचा स्पष्ट उल्लेख ऋग्वेदात नाही हे थोडे खटकण्यासारखे आहे. परंतु आपण दाखविल्याप्रमाणे आर्यांनी भारतात आल्यावर अडीच-तीन हजार वर्षांनी ऋग्वेदाची रचना केली. त्यामुळे कदाचित त्यांना आपल्या मूलस्थानाची विस्मृती झाल्यामुळे त्याचा उल्लेख झाला नाही. परंतु पुराणात तो आहे याचे कारण पार्जिटर यांनी हे दाखवून दिले आहे की वेदांपेक्षाही अति प्राचीन परंपरा प्राणात आहेत.

अल्ताई दागच्या भागात दीर्घकाळ रात्र-दिवस आजही आहे. वेदांग ज्योतिषात (७ आणि २२) सांगितल्याप्रमाणे दिवस-रात्र यांचे प्रमाण ३:२ असे असते. म्हणजे रात्र किवा दिवस १/३ ने कमी असतो. कोच्छर यांच्या मते हे मूलस्थान

उत्तरेस ३५ अंश रेखांशावर असावे. ते अल्ताई दागच्या आसमंतात असावे. तेथे सूर्य एकदा उगवला की दीर्घकाळ टिकतो आणि तो मावळला की दीर्घ काळ रात्र सुरू होते. मानससरोवरापासून हे ठिकाण फार दूर नाही.

या सर्व पुराव्याचा पुरातत्त्वीय आणि वाङ्मयीन विचार केल्यास अति प्राचीन काळी काय घडले असावे याची कल्पना करता येते.

दहा हजार वर्षांपूर्वी मध्य आशियातील अल्ताई दाग पर्वताच्या कुशीत इंडो-आर्यन भाषा बोलणाऱ्या काही टोळ्या राहत होत्या. दहा ते पंधरा हजार वर्षांपूर्वी मध्याश्मयुगात पर्यावरण अत्यंत अनुकूल असल्यामुळे कंदमुळे, फळे, छोटे प्राणी विपुल होते. त्यामुळे थोड्या श्रमात भरपूर अन्न मिळत होते. परंतु नंतरच्या काळात पर्यावरणात बदल घडून आला आणि ते अधिकाधिक प्रतिकूल होत गेले. दुष्काळ पडू लागले. थंडी खूप वाढली. त्यामुळे आर्यांना तेथून स्थलांतर करणे भाग पडले. त्यांची भटकंती सुरू झाली. दीर्घकाळ भटकल्यानंतर अफगाणिस्तानातल्या मध्य भागात ते आले आणि थोडेफार स्थिरावले. त्यांच्या मूलस्थानाचे नाव (भैर्यानाम् वेजो) त्यांनी त्या प्रदेशाला (हल्लीचे अरियाना) दिले. तेथे त्यांनी पशुपालन आणि थोडीफार शेती सुरू केली. अक-कुप्रुक आणि घर-ई-मार येथे त्याचा पुरावा मिळतो. वाङ्मयीन पुरावाही त्याला पुष्टी देतो. महाभारतात सांगितल्याप्रमाणे पुरुरवस् ऐल ज्याचा उल्लेख वैदिक वाङ्मयातही आहे- हा वाल्हिक देशातून आलेला होता. वाल्हिक देश म्हणजे सध्याचा अफगणिस्तानातील बाल्ख. यदु-तुर्वश आणि अनु-द्रुह्यु हे लोक सुद्धा अतिप्राचीन काळी अफगाणिस्तानच्या डोंगराळ प्रदेशातून भारतात आले होते. आर्यांची वस्ती तेथे झाली म्हणून त्यांनी त्याला
आरियाना नाव दिले असावे.

अफगाणिस्तानातून ही आर्यमंडळी पुढे भारतात सरकली आणि सिंधुच्या खोऱ्यात इ.पू. ५०००-४५०० च्या सुमारास राहू लागली. त्यांच्या वसाहती मेहेरगढ, (तिसरा कालखंड, 'टोगाओ संस्कृती'), गुमला, किले गुल महंमद येथे झाल्याचा पुरातत्त्वीय पुरावा आहे. मोहोंजोदारो येथील सर्वप्रथम वस्ती या आर्यांचीच असावी, परंतु तेथे भूजल पातळी खूप वर असल्यामुळे खालच्या थरांचे उत्खनन अद्याप करता आले नाही. या आर्यांची घरे कच्च्या विटांची असून लांब-रुंद चौकोनी आकाराची होती. शेळ्या-मेंढ्या, गायी-गुरांची खिल्लारे ते बाळगीत, बार्ली-गव्हाची शेती करीत, मातृदेवतेची पूजा करीत. उत्कृष्ट रंगीत खापराची भांडी ते चाकावर घडवीत. मृताचे दफन करीत.

सिंधुच्या खोऱ्यातून आर्यांच्या टोळ्या थोड्याच काळात पूर्वेकडे सरस्वतीच्या खोऱ्यात आल्या. तेथे 'हाक्रा संस्कृती' (इ.पू. ३८००-३२००) बहरली. त्यातून सरस्वतीच्या खालच्या खोऱ्यात पूर्वसिंधु संस्कृती उत्क्रांत झाली (इ.पू. ३२००-
२६००) आणि पर्यावरण अत्यंत अनुकूल असल्यामुळे नागरी सिंधु संस्कृती (इ.पू. २६००-२०००) भरभराटीस आली. या काळातील जो काही थोडा पुरावा उपलब्ध आहे, त्यावरून नागरी सिंधु लोक बहुधा इंडो-आर्यन (संस्कृत किंवा प्राकृत) भाषा बोलत असावेत असे वाटते. या लोकांची शहरे आखीवरेखीव होती, त्यात बहुमजली घरे होती, विहिरी होत्या. त्यांचा पश्चिम आशियाशी असलेला व्यापार अत्यंत भरभराटीस आला होता. ते अग्निपूजक होते. बहुधा ऋग्वेदाची रचना या काळात सुरू झाली असावी.

हे सारे वैभव नियतीला फार काळ पाहवले नाही. इ.पू. २२००-२००० या काळात भूकंपाने हादरे दिले. हळूहळू पर्यावरणात बदल घडून ते प्रतिकूल होऊ लागले. व्यापार मंदावला. समुद्रपातळी खाली गेल्यामुळे बंदरे गाळाने भरून गेली. अशा रीतीने नागरी सिधुचा ऱ्हास सुरू झाला. त्यानंतरची उत्तर सिंधु संस्कृती ही नागरी सिंधुची क्षीण सावली म्हणता येईल. आता पूर्वीची शहरे नाहीशी झाली, त्याच्या जागी लहान खेडी सर्वत्र दिसू लागली, व्यापार मंदावला, त्याची जागा वस्तू विनिमयाने घेतली; सरस्वती खालच्या खोऱ्यात आटली, त्यामुळे शेतीचा ऱ्हास झाला. अनेकांना स्थलांतर करावे लागले. काहींना केवळ पशुपालनावर जगावे लागले. अशा अनेक आपत्तींना आर्यांना तोंड द्यावे लागले. अशा वेळी एकच गोष्ट शक्य होती, ती म्हणजे देवाला शरण जाणे. ऋग्वेदातील ऋचा याची साक्ष देतात. पाण्यासाठी ते इंद्राची करुणा भाकतात. सबंध ऋग्वेदात इंद्र-वृत्राचा संघर्ष आहे, तो पाण्यासाठी आहे. इंद्राने वृत्राचा वध केला आणि आर्यांना पाणी मिळवून दिले. परंतु नंतर परिस्थिती आणखी बिघडली. त्याचे प्रतिबिंब उपनिषदातील तत्त्वज्ञानात दिसते.

शेवटी मुख्य प्रश्न राहतोच. तो हा की, आर्य हे मूळचे भारतातले का भारतात बाहेरून आले? या प्रश्नाचे उत्तर आपण कोणत्या दृष्टीने त्याकडे पाहतो त्यावर आहे. आजचा भारत पाहिला, तर ते अफगाणिस्तानातून म्हणजे बाहेरून आले असे म्हणावे लागेल, आणि आता मध्ये पाकिस्तानही आहे. पण पूर्वी मौर्यांच्या काळापासून अफगाणिस्तानचा बराचसा भाग भारताचा होता. दहाव्या शतकापर्यंत तेथे शाही या हिंदु राजवंशाचे राज्य होते आणि मध्ययुगात तेथे मोगलांचा अंमल होता. अर्वाचीन काळात ब्रिटिशांनी त्याचा निराळा देश केला. पण दहा हजार वर्षांपूर्वी आर्यांच्या टोळ्या मध्य आशियात राहत होत्या. तेथून त्यांची स्थलांतरे सुरू झाली. तसे पाहिल्यास सात हजार वर्षांपूर्वी ते भारतात आले. तेव्हा त्यांना परकीय म्हणणे योग्य नव्हे. परंतु हे सर्व प्रश्न आता गैर आहेत, कारण साऱ्या जगाची आजची लोकसंख्या ही ८०,००० वर्षांपूर्वी पूर्व आफ्रिकेतून निघालेल्या एका काळ्या (निग्रो) मातेची संतती आहे, हे आता गुणसूत्रांच्या (*DNA*) विष्लेषणावरून सिद्ध झाले आहे. १२

**आर्यांची स्थलांतरे**

उत्तर सिंधु काळात प्रतिकूल पर्यावरणामुळे आणि सरस्वती नदी आटल्यामुळे आर्यांना उदरनिवार्हासाठी इतरत्र स्थलांतर करणे भाग पडले. अनेकांनी सरस्वतीच्या खालच्या खोऱ्यातून वरच्या भागात जाऊन वसाहती स्थापन केल्या, काही पश्चिमेकडे सिंधुच्या खोऱ्यात गेले, काहींच्या नशिबी पशुपालन करून भटके जीवन आले. प्रतिकूल पर्यावरण्याची तीव्रता जशजशी वाढत गेली तसे काहींना पश्चिमेकडील देशांत जावे लागले. दुह्यु लोकांना म्लेच्छ देशात जावे लागले असे पुराणे सांगतात. वैदिक वाङ्मयातही त्याचा सूर उमटलेला दिसतो. अग्नीने हाकलून दिल्यामुळे लोकांनी वस्त्या सोडून परदेशांत स्थलांतर केले असे तैतिरीय ब्राह्मणात (२,४,६,८) सांगितले आहे. पश्चिम आशियात नुझी, अमार्ना, अलालख, बोघाजकोई आणि इत्तर काही स्थळांच्या उत्खननात याचा पुरातत्त्वीय पुरावा मिळतो. तेथे इंडो-आर्यन भाषा बोलणारे लोक येऊन राहिले हे त्यांच्या संस्कृत नावांवरुन दिसून येते. दसरत्त (दशरथ), रामम् (राम), जयललित (सेनाधिकारी), शत्रुघ्न, बीरदेव (वीरदेव) इत्यादी
नावांवरुन ते सिद्ध होते.

मॅलरी यांचे या बाबतीतील भाष्य चिंतनीय आहे."पश्चिम आशियातील इंडो-आर्यन आणि भारतातील इंडो-आर्यन यांचे एकमेकांशी कशा प्रकारचे संबंध होते याचा विचार करणे आवश्यक आहे. मिटानी साम्राज्याच्या हासानंतर पश्चिम आशियातील इंडो-आर्यन भारतात गेले असावेत असे म्हणावे, तर त्याला कोणताही पुरावा नाही. या उलट भारतातील इंडो-आर्यन पश्चिम आशियात गेले असे म्हणावे, तर त्यालाही पुरावा नाही."

खरे म्हणजे मॅलरी यांच्या दुसऱ्या विधानाला भक्कम पुरावा आहे. पण पाश्चात्त्य विद्वानांनी एकदा ढापणे लावून पाहावयाचे ठरविल्यानंतर स्वच्छ पुरावासुद्धा त्यांच्या नजरेस येणार नाही. दाशराज्ञ युद्धात पराभव झाल्यानंतर द्रुह्यु हे त्यांच्या मायभूमीतून (राजस्थानातून) म्लेच्छ देशात गेले, याचा पुराणात उल्लेख आहे. अनुंनीसुद्धा तेच केले. दाशराज्ञ युद्धानंतर काही जमातींनी भारताबाहेर वसाहती स्थापन केल्या. त्या खालीलप्रमाणे होत्या

१. पृथु (पार्थव) (ऋ. ७.८३.१) - पार्थियन. .
2. पार्सस् (पार्श्व) (७.८३.१)- पर्शियन.
३. पख्त (७.१८.७)- पख्तून.
४. भालाणस (७.१८.७)- बलुची.
५. शिव (७.१८.७)- शिबि.
६. विषाणिन् (७.१८.७).
७. खिव (७.१८.७)- कोरास्मियन.
८. भृगु : श्राको फ्रिगियन.

हे वरील सर्व लोक इराण आणि अफगाणिस्तानच्या सीमावर्ती प्रदेशांत राहत होते. ते सर्व इंडो-आर्यन होते. परंतु दाशराज्ञ युद्धात पराभव झाल्यामुळे त्यांना तेथून पश्चिमेकडे दूरवर जावे लागले. या शिवाय आणखी दोन जमाती होत्या. सिम्यु

(ऋ. ७.१८.५) हे बहुधा प्राचीन अल्बानियातील सिमिओस असावेत आणि आलिन (ऋ. ७.१८.५) हे प्राचीन ग्रीसमधील हेलन असावेत असा विद्वानांचा कयास आहे.

दाशराज्ञ युद्धातील पराभवामुळे आणि अधिकाधिक प्रतिकूल होत जाणाऱ्या पर्यावरणामुळे आर्यांच्या टोळ्यांना स्थलांतरे करावी लागली याचा पुसटसा उल्लेख ऋग्वेदातही आहे. आठव्या मंडलांतील ऋचांवरून आर्य एका निराळ्या पर्यावरणाच्या प्रदेशात प्रवेश करीत असल्याचे दिसते. या पश्चिमेकडील प्रदेशांत उंट, घोडे, मेंढ्या अधिक होत्या. विख्यात पंडित मायकेल विट्झेल यांनी इराण, मध्य आशिया आणि अफगाणिस्तान या प्रदेशात राहणाऱ्या जमातींची ग्रीक आणि लॅटिन वाङ्मयात दिलेल्या माहितीची जंत्री दिली आहे. त्यात पणि (ग्रीक पारनोई), दास (इराणी दाहे आणि ग्रीक दाई), सिंधु (ग्रीक सिंदोई), परसु (पर्शियन), पख्त (पख्तून), दृभिक (पर्शियन देभिकिस) इत्यादी नावे आहेत. परंतु विशेष म्हणजे विट्झेल यांनी या पुराव्याचा उपयोग कसा करून घेतला आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. एकदा आर्य भारतात इ.पू. १००० च्या सुमारास आले असा पक्का ग्रह करून घेतल्यावर वर दिलेल्या सर्व जमाती इ.पू. दुसऱ्या सहस्रकात भारताबाहेर पश्चिम आशियात राहत होत्या आणि नंतर भारतात आल्या, असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. उलटे तर्कशास्त्र कसे असते याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. या उलट इ.पू. २००० मध्ये आर्य भारतात होते आणि येथून त्यांनी पश्चिमेकडे स्थलांतर केले असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. या संदर्भात ऋग्वेदात (७.६.३) अग्नीने दस्युंना हाकलून दिल्याचे सांगितले आहे, हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. मॅलरी यांनी काढलेला निष्कर्ष त्यांच्याच शब्दांत देणे योग्य होईल.

"पश्चिम आशियातील ब्राँझयुगीन कोरीव लेखात इंडो-आर्यन मधूनमधून डोकावतात. हिटाईटची जागा हट्टीने आणि असिरीयनने घेतली; आर्मेनियन लोकांनी इंडो-आर्यन लुवियन लोकांना आपल्यात सामावून घेतले, इराणी लोक एलाम प्रांतावर आपला अंमल प्रस्थापित करतात... असा इंडो-आर्यन प्रभाव वाढत जातो. मध्य तुर्कस्तानात सुद्धा आधीची हट्टीक भाषा जाऊन तिच्या जागी हिटाईट, नंतर लुवियन, फ्रिगियन आणि शेवटी सेल्टिक भाषा बोलल्या जातात." हा इंडो-आर्यन प्रभाव कसा घडून आला? भारतात इंडो-आर्यन बोलणारे लोक सात हजार वर्षांपासून होते आणि चार हजार वर्षांपूर्वी ते देशोधडीला लागले. त्यातले काही पश्चिम आशियात गेले. याचा उत्कृष्ट विश्वसनीय पुरावा आहे.

**इराण**

झोरोॲस्ट्रियन लोकांचा झेंड-अवेस्ता हा ग्रंथ भाषेच्या दृष्टीने ऋग्वेदाला अगदी जवळचा आहे. तो त्यांचा वेदच म्हणावा लागेल. त्याचा काळ इ.पू. १००० असा आहे, परंतु काही तो इ.पू. १४०० पर्यंत मागे नेतात. कसेही असले तरी तो ऋग्वेदानंतरचा आहे यात दुमत नाही. ऋग्वेद आणि अवेस्तामध्ये प्रतिबिंबित झालेल्या समाजजीवनांत लक्षणीय साम्य आहे. दोघांची शेती प्राथमिक अवस्थेत होती आणि पशुपालनावर अधिक भर होता. धार्मिक समजुतीत मात्र खूपच फरक होता. इंडो-इराणी लोकांची असुर दैवते असून देवांना ते दैत्य मानीत. अवेस्ताचे वेंदिदाद आणि विस्पराद व यास्न असे दोन मुख्य भाग आहेत. वेंदिदादमध्ये त्यांच्या धार्मिक समजुती आणि मिथकांची माहिती आहे. याशिवाय त्यात अहूर माझदा या इंडो-इराणी (झोरोॲस्ट्रियन) लोकांच्या नेत्याने त्यांना घेऊन जी स्थलांतरे केली त्यांची माहिती दिलेली आहे (फरगर्द १-१). प्रतिकूल पर्यावरणामुळे त्यांना ती करावी लागली. एकूण सोळा ठिकाणी तो फिरला. त्यातील सुरुवातीची बहुसंख्य अफगाणिस्तानातील आहेत. ती सारी पूर्वेकडील प्रदेशांत आहेत. उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील एकही नाही. सिरदर्याच्या (पूर्वीची जक्सार्टेस नदी) उत्तरेकडचा प्रदेश त्यांना माहीत नव्हता. अवेस्तात सांगितलेले सोळा प्रदेश सांगीतले होते :

अँर्यानाम् वेजो हे आर्यांचे मूळ वसतिस्थान होते याचा पूर्वी उल्लेख केलेला आहे. तिथे झोरोॲस्ट्रियनांचे वास्तव्य होते. ती भूमी निसर्गसंपन्न होती. तिथे दहा महिने हिवाळा आणि दोन महिने उन्हाळा असे. परंतु हे स्थान नेमके कोठे होते याबद्दल विद्वानात वाद आहे. काहींच्या मते ते हल्लीच्या आझरबैझानजवळ, तर काहींच्या मते तो प्रदेश हिंदुकुश पर्वतराजीत, अफगाणिस्तानात होता. अवेस्तात दिलेली बहुसंख्य स्थळे अफगाणिस्तानात, काबुल-कंदहारच्या परिसरातील आहेत. परंतु हल्लीचे तेथील आरियाना या भागात ते असण्याची दाट शक्यता आहे. हा डोंगराळ

प्रदेश असून तेथे दीर्घकाळ कडक थंडी असते. वांगुही दैत्याने तो प्रदेश निर्माण केला होता. परंतु एकंदरीत पुराव्याचा विचार केल्यास आर्यांचे हे मूळ वसतिस्थान खूप उत्तरेस मध्य आशियात असावे. आर्य स्थलांतर करताना मध्य अफगाणिस्तानात येऊन पोहोचले, तेथे त्यांनी वस्ती केली आणि आपल्या मूलस्थानाचे नाव त्यांनी त्या प्रदेशाला दिले. हिंदुकुश पर्वताच्या उतारावरून ते हेलमंड नदीच्या खोऱ्यापर्यंतचा हा प्रदेश असावा.

या प्रदेशासंबंधीची परंपरा जी ऋग्वेदात आणि अवेस्तात आढळते ती समान आहे. अवेस्तामध्ये अहूर माझदाने यिम ह्या और्यानाम् वेजोच्या राजाला लोकांचा कडक थंडीपासून बचाव करण्यास सांगितले. कारण तिथे सहा महिने दिवस आणि सहा महिने रात्र असे. ऋग्वेदातही हा उल्लेख आढळतो. ॲर्यानाम् वेजो ही स्वप्नभूमी असली, तरी तेथील भयानक थंडीमुळे आर्यांना तेथून स्थलांतर करणे भाग पडले. तेथे मुसळधार पाऊस आणि मोठ्या प्रमाणावर बर्फवृष्टी होत असे. हल्लीच्या कझाकस्तानच्या उत्तरेस अल्ताई दाग पर्वताच्या कुशीत हे स्थळ असावे. तेथे दीर्घकाळ दिवस आणि रात्र असते. एकंदरीत पुराव्याचा विचार करता आपल्याकडील हरियाणा म्हणजे और्यानाम् वेजो असावे असे वाटते; आणि येथून आर्यानी इ.पू. २००० नंतर स्थलांतर केल्यानंतर अफगाणिस्तानातील आरियाना वसविले असावे असा तर्क करणे चूक ठरणार नाही. आर्याच्या टोळ्यांना और्यानाम् वेजो (इराणवेज) कडाक्याच्या थंडीमुळे सोडावे लागले. हिंदुकुश पर्वतीय प्रदेशातसुद्धा भयानक थंडी असते. शिवाय इ.पू. २००० पासून पर्यावरण अधिकाधिक शुष्क झाल्यामुळे थंडी अधिक तीव्र झाली असावी, यात शंका नाही. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते इ.पू. २००० ते इ.पू. ५०० या काळात सर्वत्र प्रतिकूल पर्यावरण होते. युरोपमध्ये तर हिमयुगासारखी थंडी होती. अणुयुद्धानंतर जगात जी थंडी पडेल, तशी थंडी त्याकाळी होती असे शास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे. त्या काळी जवळजवळ हिमयुगच अवतरले होते असे समजण्यास हरकत नाही. पुरापराग विश्लेषणावरूनही त्याला पुष्टी मिळते.

अवेस्तात वर्णन केलेली इतर स्थळेसुद्धा कालांतराने आर्यांना प्रतिकूल पर्यावरणामुळे सोडणे भाग पडले. भूकंप, थंडी, रोगराई, वन्य पशु इत्यादी कारणांमुळे तसे करावेलागले. सप्तसिंधुच्या (हप्तहिंदु) प्रदेशात ते आले, परंतु आंग्र मैन्युने तेथे कडक उन्हाळा निर्माण केल्यामुळे तेथेही ते राहिले नाहीत. तेथून ते इराणमध्ये गेले आणि राहिले. इ.पू. २००० नंतरच्या काळात मोठ्या प्रमाणात अफगाणिस्तानात आणि दक्षिण तुर्कमेनियामध्ये नव्या लोकांच्या आगमनाचा पुरातत्त्वीय पुरावा उपलब्ध आहे.

आर्य हप्तहिंदुच्या प्रदेशातून- म्हणजे भारतातून- इराणमध्ये गेले या अवेस्तामध्ये दिलेल्या सर्वात महत्त्वाच्या पुराव्याकडे विद्वानांचे कसे लक्ष गेले नाही याचे आश्चर्य वाटते. खरे म्हणजे याचा दाखला लोकमान्य टिळकांनी दिलेला होता. तेव्हा हा पुरावा गैरसोयीचा, अडचणीत टाकणारा असल्यामुळे विद्वानांनी त्याकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले असे म्हणणे अधिक योग्य होईल. अवेस्ताचा काळ इ.पू. १००० असून तो कितीही ताणला तरी इ.पू. १४०० च्या मागे नेता येणार नाही. तेव्हा इ.पू. २००० नंतर, म्हणजे इ.पू. १८००-१६०० च्या दरम्यान सिंधु संस्कृतीचा अंतकाळ जवळ आल्यापासून आर्य भारताबाहेर जाऊ लागले असावेत. इराणमध्ये ते गेले, तेथील नद्यांना त्यांनी आपल्याकडची नावे दिली. तेथील सध्याच्या हेलमंड नदीचे पार्शियन नाव हरैवती- म्हणजे सरस्वती होते. कारण पर्शियन मध्ये 'स'चा 'ह' होतो. तसेच हल्लीची तेथील हरी-रुद- प्राचीन हरोयू म्हणजे शरयू. प्राचीन काळी भारतीय आग्नेय आशियात गेले, तेथे त्यांनी मथुरा, द्वारावती (द्वारका) ही नावे त्यांनी वसविलेल्या शहरांना दिली. युरोपियन लोक अमेरिकेत जाऊन राहिले, तेव्हा त्यांनी हेच केले. उदा. यॉर्कचे न्यूयॉर्क.

आणखी एक महत्त्वाचा पुरावा अवेस्तामध्ये आढळतो. त्यात भारतातील नद्यांची नावे पूर्वेकडून पश्चिमेकडे, शरयूपासून सिंधुपर्यंत, या क्रमाने दिली आहेत. या मार्गाने आर्य इराणमध्ये गेले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अवेस्ताच्या रचनाकाराला वैदिक परंपरेची माहिती होती. परंतु ऋग्वेदात कोठेही इराणी परंपरेचा पुसटसासुद्धा उल्लेख येत नाही. हा सज्जड पुरावा आर्य भारतातून इराणमध्ये गेले, हे सिद्ध करतो.

या काळात (इ.पू. १८०० नंतर) ऋग्वेदातील 'नदी-स्तुती' या ऋचांची (१०.७५.५.६) रचना झाली असावी. हे दहावे मंडल शेवटी जोडले गेले. आर्याचा विस्तार पूर्वेकडे झाला असल्यामुळे त्यात नद्यांची नावे पूर्वेकडून पश्चिमेकडे

या क्रमाने येतात. त्यात गंगेचा एकमेव उल्लेख आहे. गंगेपासून ते पार सिंधु आणि काबूलपर्यंतच्या नद्यांची यादी आहे. त्यावरून त्या रचनाकारांचे भौगोलिक ज्ञान किती पक्के होते याची कल्पना येते. त्यात खालील नद्या आहेत.

'गंगा, यमुना, सरस्वती, शतुद्रि (सतलज), परुष्णी (रावी), मरुद्दधा, असिक्नि (चिनाब), अर्जिकिया, वितस्ता (झेलम), सुसोम (सोहन), सिंधु प्रथम त्रिस्तमाला मिळते आणि नंतर सुसर्तु, रसा, श्वेता, (सुवास्तु, स्वात), कुभा (काबुल), गोमती (गोमल), कुमु (कुर्रम) आणि मेहत्लु.'

या ऋचांमुळे आर्य भारतात बाहेरून इ.पू. १०००-१२०० मध्ये आले असे मानणाऱ्या विद्वानांची पंचाईत झाली आहे; परंतु आर्य इराणमध्ये आणि भारतात येण्यापूर्वीच त्यांच्या टोळ्या वेगळ्या झाल्या होत्या, असे त्यांना वाटते. केंब्रिज विद्यापीठातील प्रख्यात संस्कृत पंडित बरो यांचे विधान विचार करण्यासारखे आहे. "आमचे म्हणणे चूक असेल तर आर्य प्रथम भारतात आले, पंजाबात स्थिरावले आणि पुन्हा त्यांनी पश्चिमेकडे स्थलांतर केले असे दाखवून द्यावे लागेल. स्टेन कोनोव्ह यांना हे मान्य होते, पण पुराव्याअभावी त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता नाही."

या ऋचांकडे विद्वानांनी दुर्लक्ष केले कारण अवेस्तातील पुराव्याचाही त्यांना विसर पडला होता. तेव्हा आर्य सप्तसिधुच्या प्रदेशातून इराणमध्ये गेले हे कसे मान्य करणार? भारतातून आर्यांना इराणमध्ये स्थलांतर करावे लागले याचे प्रतिकूल पर्यावरण हे एक कारण होते. परंतु याशिवाय त्यांच्यात वादही होता. आर्यांचे देव हे इराण्यांचे दैत्य, आर्यांचे दैत्य (असुर) हे इराण्यांचे देव, त्यामुळे ते एकत्र राहणे अशक्य होते. ऋग्वेदातील भृगु हे असुरांचे (अहूर) पुरोहित (संस्कृत अथर्वन्, इराणी अश्रवन) आणि अंगिरस (इराणी अंग्र) हे आर्यांचे पुरोहित होते.

इराणी आर्यांनी माझानियन लोकांचा छळ केला, कारण ते देवांची पूजा करीत. माझना हे कॅस्पियन समुद्राचा दक्षिण किनारा आणि अलबुर्झ पर्वतच्या मधल्या प्रदेशात होते. पारनोई (पणि) हे दास/दस्युंपैकीच होते. दास/दस्यु हे इराणमधील दाह/दाहे. ते सर्व मध्य आशियातील मार्गियानामध्ये राहत होते. तेथे हिरकानियाच्या जवळ आजही दाहिस्तान नावाचा प्रदेश आहे. त्या पुराव्याचा उपयोग पाश्चात्त्य विद्वान वेगळ्या प्रकारे करतात. त्यांच्या मते आर्य भारतात येण्यापूर्वी त्या प्रदेशात राहत होते. परंतु प्रा. एस.एस. मिश्र यांनी हे कसे चूक आहे हे दाखवून दिले आहे. ऋग्वेदात जे काही थोडे फिनो-उग्रीयन शब्द आहेत, ते या लोकांनी आणलेले नाहीत. मॅक्समुल्लरचेही हेच मत होते. या उलट अफगाणिस्तानात हरैवती (सरस्वती), हरोयू (शरयू) ही नद्यांची नावे त्याला पुष्टी देतात. कारण 'स' चा 'ह' नंतर झाला. शिवाय अवेस्तामध्ये भारतीय नद्यांची नावे आहेत, परंतु ऋग्वेदात मात्र एकाही इराणी नदीचे नाव नाही. याचाच अर्थ इराणी लोकांना भारतीय नद्यांची नावे माहीत होती आणि इराणमध्ये गेल्यावर त्यांनी तिथल्या नद्यांना भारतीय नावे दिली. मॅक्समुल्लरना हे पटले होते :

"झोरोॲस्ट्रियन लोकांनी उत्तर भारतातून येऊन (इराणमध्ये) वसाहती स्थापन केल्या... दोन टोळ्यांतील वादामुळे हे घडून आले आणि ते आराकोसिया आणि पर्शियामध्ये गेले. तेथील गावांना आणि नद्यांना त्यांनी भारतीय नावे दिली."

आर्यांच्या शोधात / ११४

मॅक्समुल्लरचा विचार नंतर बदललेला असला तरी अलीकडे जॉर्ज एडोंसी यांनी त्याचे स्पष्टीकरण केले आहे."

"सरस्वती हे पूर्ण भारतीय (संस्कृत) नाव आहे आणि नंतर इराणी लोकांनी ते घेतले. झेंड-अवेस्तात इराणबाहेरील प्रदेशांची माहिती असल्याचे दिसून येते, परंतु ऋग्वेदात मात्र तसे दिसत नाही."

आर्य भारताबाहेर जसे इराणमध्ये गेले तसेच काही मंडळी त्यापुढे इराक, तुर्कस्तान, इजिप्त, इथिओपिया आणि ग्रीसमध्ये जाऊन पोहोचल्याचा पुरावा मिळतो. हिटाईट, मिटानी आणि कॅसाईट हे इंडो-युरोपीय भाषा बोलणारे पश्चिम आशियातील मुख्य गट तेथील मूळ रहिवासी नसून बाहेरून तेथे आलेले होते. त्यांनी अनुक्रमे कपाडोशिया, बाबिलोनीया आणि मेसोपोटेमियात स्वाऱ्या करून ते प्रदेश जिंकले व आपला अंमल इ.पू. दुसऱ्या सहस्रकाच्या पहिल्या अर्धकात (इ.पू. २०००-१५००) तेथे स्थापित केला. काही विद्वानांचे असे मत आहे की, फिनो उग्रीक लोकांनी शेतीचे ज्ञान इंडो- आर्यन लोकांपासून घेतले असावे. याचे मुख्य मुख्य कारण असे की त्या भाषेतील काही शब्द - उदा. धान्य,

गवत, मेंढी इत्यादी हे इंडो-युरोपीय भाषेतून घेतलेले असावेत. शिवाय त्यांच्या ऋग्वेदातील पणि हे लेबनानच्या किनारी प्रदेशातील फिनिशियन असावेत, असा समज आहे. हे शक्य आहे कारण फिनिशियन लिपी जिच्यातून ग्रीक, लॅटिन, रोमन लिप्या उत्क्रांत झाल्या आणि सिंधु लिपीतील काही चिन्हे यात लक्षणीय साम्य आहे. सिंधु लिपी फिजिशियनच्या खूप आधीची आहे, हे निराळे सांगणे नकोच.

**मध्य आशिया**

मध्य आशिया हा एक प्रचंड भूभाग आहे. पश्चिमेकडे कॅस्पियन समुद्रापासून ते पूर्वेकडे चीनच्या सरहद्दीपर्यंतचा प्रदेश त्याने व्यापला आहे. आज हा प्रदेश म्हणजे वैराण वाळवंट असले तरी पुरातत्त्वाच्या दृष्टीने तो अत्यंत समृद्ध आहे, प्राचीनकाळी तेथील संस्कृती भरभराटीस आल्या होत्या. चीनपासून रोमपर्यंत जाणारा 'सिल्करुट' याच भागातून जातो. एकेकाळी तो व्यापाऱ्यांनी गजबजलेला होता आणि तेथे मोठ- मोठाली वैभवशाली शहरे होती. भारताशी त्यांचे घनिष्ट संबंध होते आणि आर्यांच्या समस्येच्या संबंधात तर त्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. बहुसंख्य विद्वानांच्या मते आर्यांचे मूळ वसतिस्थान मध्य आशियात असावे. तेथे उंच पहाड आणि वाळवंटे आहेत; परंतु त्यांच्यामध्ये ओॲसिस आहेत. त्यामुळे तेथे संस्कृती बहरली. पूर्वी ज्याकाळी पर्यावरण अनुकूल होते, त्यावेळी तेथे नागरीकरण झाले. पुढे पर्यावरण प्रतिकूल झाल्यामुळे तो प्रदेश उजाड झाला. तेथे अनेक ठिकाणी सिंधु संस्कृतीशी संपर्क असल्याच्या खुणा आहेत आहेत. तर्कमेनिस्तानात अल्टिन डेपे या स्थळी उत्खननात सिंधु मुद्रा, मणी, हस्तिदंती आणि शंखाच्या वस्तू सापडल्या. त्या इ.पू. २२००-२००० या काळातील आहेत. त्या काळात सिधु संस्कृतीचा ऱ्हास सुरू झाला होता, लोकांचे स्थलांतर सुरू झाले होते. त्यातील काही लोक मध्य आशियात पोहोचले असावेत. त्याहून अत्यंत महत्त्वाचा पुरावा तेथे सापडला. अल्टिन डेपे ही नगरी सिंधु शहरांसारखी आखीवरेखीव होती व तिची चार भागांत विभागणी केलेली होती. सिंधु संस्कृतीच्या शहरातही अशीच विभागणी आढळते. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे धोलावीरा (गुजरात). हुबेहूब त्याच प्रकारची विभागणी अल्टिन डेपे येथे होती. इतकेच नव्हे, तर प्रत्येक भागातील लोकांची आर्थिक स्थिती, समाजातील दर्जा, भोजन पद्धती, दफन पद्धती इत्यादीत फरक होता. सिंधु नगरात ही विभागणी इ.पू. २६०० पासून केली जात होती आणि अल्टिन डेपे येथे ती इ.पू. २१०० च्या सुमारास आढळते. तेव्हा हा सिंधु संस्कृतीचा प्रभाव असण्याची दाट शक्यता आहे.

सिंधु संस्कृतीचा ज्याप्रमाणे इ.पू. २००० पासून हास सुरू झाला तसा मध्य आशियात पुढे सुरू झाला. इराणमधील टेपे हिसार आणि तुरांग टेपे, आणि मध्य आशियातील नमाझगा आणि अल्टिन डेपे येथेही इ.पू. १५०० पासून हास सुरू झालेला दिसतो. सितारता येथील स्मशानातील काही दफने ऋग्वेदात वर्णिलेल्या प्रकारची वाटतात. त्यात घोडा बळी दिला जात असे. इ.पू. दुसऱ्या सहस्रकाच्या अखेरीस तेथे इंडो-इराणी लोक असल्याचा पुरावा आढळतो.

**इराक**

सिंधु संस्कृतीच्या हासानंतर आर्यांच्या टोळ्यांची स्थलांतरे सुरू झाली आणि काही लोक इराणमध्ये गेले हे आपण पाहिले आहे. काहीजण पुढे इराकमध्ये गेले. तेथे इ.पू. अठराव्या शतकात कॅसाईट नावाचे नवे लोक आले. त्यांनी तेथे स्वारी करून आपला अंमल बसविला. त्यांनी इ.पू. १७६० मध्ये बाबिलोन जिंकले व इ.पू. ११७० पर्यंत त्या देशात राज्य केले. त्यांच्या काही लोकांची आणि देवतांची नावे इंडो-आर्यन आहेत. उदा. सुरियास (सूर्य), मरुतस् (मरुत्), सुमालिया (पर्वताची देवता, हिमालय), इत्यादि. एका राजाचे नाव अबिरत्त (अभिरथ) होते. तो इ.पू. १६७८ मध्ये राज्य करीत होता. बुग म्हणजे देव (भग, भगवान्); इंद-बुग (इंद्र भगवान). विशेष म्हणजे कॅसाईट लोकांच्या काळात विटांच्या आकाराचे प्रमाण ४:२:१ असे झाले. हा निश्चित सिंधु संस्कृतीचा प्रभाव असावा.

कॅसाईट लोक इराक जिंकू शकले याचे एक कारण म्हणजे त्यांच्याजवळ घोडा होता. त्यापूर्वी तेथे घोडा माहीत नव्हता. बाबिलोनियन आणि असिरीयन भाषेत घोड्याला 'असू' असा शब्द आहे. तो संस्कृत 'अश्व' पासून आलेला आहे. त्यांच्याकडील लेखात 'कुर्र' हा शब्द येतो, त्याचा अर्थ 'गाढव' कुर्र, खुर या शब्दांचे घोडा या शब्दाशी साम्य

आहे. सर्व भारतीय भाषांत 'घोडा' हा शब्द आहे. तो घोटक या तिबेटन भाषेतून आला आहे. खुद्द कॅसाईट लोकसुद्धा शतपथ ब्राह्मणात (११.८.४.६) उल्लेखिलेले केशि असावेत असे विद्वानांचे मत आहे.

मेडिटरेनियन समुद्रकिनारीचे फिनिशियन हे ऋग्वेदातील पणि असावेत असे समजले जाते. सिंधु लिपी आणि फिनिशियन यातील काही चिन्हे समान आहेत, हे या संदर्भात ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

**ॲनाटोलिया (तुर्कस्तान)**

ॲनाटोलिया हा तुर्कस्तानचा एक प्रांत. तेथे कुल टेपे येथील उत्खननात सापडलेल्या लेखात इंडो-आर्यन नावे सापडली (इ.पू. १८ वे शतक), तर बोघाजकोई (प्राचीन हत्तुसा) येथे २५,००० हून अधिक इष्टिका लेख सापडले. ते इ.पू. १७५०-१२०० मधील आहेत. ते सर्व हिटाईटांच्या काळातील आहेत. हिटाईट ॲनाटोलियात इ.पू. अठराव्या शतकात आले. मिटानी सीरियात होते. त्यांच्या आणि इजिप्तमधील फरोहांच्यात झालेल्या पत्रव्यवहारात अनेक इंडो-आर्यन नावे येतात. फरोहा त्यांना रथ पाठविण्यासाठी विनंती करीत.

बोघाजकोई येथे ह्यूगो विंकलर या जर्मन पुरातत्त्वज्ञाने १९०७ मध्ये उत्खनन केले. त्यात त्याला एक मोठा लेख शिलेवर कोरलेला सापडला. त्यात मिटानी आणि हिटाईट यांच्यात झालेल्या तहाच्या अटी आहेत. त्यात त्यांनी त्यांच्या देवतांना आवाहन केले आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत :

| | |
|---|---|
| इंदर (हिटाईट) | इंद्र (आर्य) |
| मित्रसिल (हिटाईट) | मित्र (आर्य) |
| नासतिअन्न (हिटाईट) | नासत्य (आर्य) |
| उरुवनस्सिल (हिटाईट) | वरुण (आर्य) |

राजांची नावेही इंडो-आर्यन आहेत. उदा. दसरत्त (दशरथ); हा मिटानी राजाचा पिता होता, इंदरव (इंद्र) हा एक उच्च अधिकारी होता. कारचेमिसचा राजा सुमितरस (सुमित्र), इत्यादी. आणखी काही नावे आहेत. किकुली नावाच्या एका हिटाईट अश्वविद्येतील तज्ज्ञाने घोडे कसे शिकवून तयार करावेत यावर एक पुस्तक लिहिले होते. त्यात अनेक संस्कृत शब्द आणि अंक आहेत. उदा. ऐक (ओक), तेर (त्रि), पंज (पंच), सत्त (सप्त), नव (नव), इत्यादी. तसेच 'ऐक वर्तन (एक वर्तन, एक फेरी), असुस्सनी (अश्वसनी), या संज्ञा संस्कृतसमान आहेत हे स्पष्ट होते. नुझी येथील कोरीव लेखात घोड्यांच्या रंगांचे उल्लेख आहेत बन्नु-ब्रु (बभ्रु, तपकिरी), पिंगर, (पिंजर, लाल), परित (पलित, राखाडी रंग) इत्यादी.

मिटानी ॲनाटोलियात इ.पू. सोळाव्या शतकात आले आणि त्यांनी सीरियात इ.पू. १४७५ ते १२६० पर्यंत राज्य केले. त्यांची भाषा इंडो-इराणी समजली जाते. ते आर्यांपैकी असून प्रथम इराणमध्ये आणि नंतर भारतात इ.पू. १००० मध्ये आले असे बहुसंख्य पाश्चात्त्य विद्वानांचे मत आहे. परंतु प्रा. एस. एस. मिश्रा यांनी बोघाजकोई लेखाचे योग्य विश्लेषण केले असून त्याचा अर्थ कसा लावता येतो हे दाखवून दिले आहे. मिटानींना इंडो-इराणी समजणे चुकीचे आहे कारण अवेस्तामध्ये इंद्र हा दैत्य आहे, परंतु ऋग्वेदात तो सर्वश्रेष्ठ देव आहे. नासत्यचे रूप 'नाहत्य' झाले असते, पण तसे दिलेले नाही. शिवाय नासत्यही अवेस्तात दैत्य आहे. वरूण हा इंडो-इराणी देव नाही. यावरून मिटानींची भाषा इंडो-इराणी नसून इंडो-आर्यन होती यात शंका नाही. तसेच किकुलीच्या लेखात 'सत्त' हे रूप आहे, ते 'हत्त' झाले असते. तेव्हा त्यांची भाषा संस्कृतच असावी. नुझी येथील लेखातील अंक इराणी नसून संस्कृत आहेत हे पूर्वीच गॉर्डन चाईल्ड यांनी दाखवून दिले होते. मिनोरोव्ह यांनी या संदर्भात काढलेले निष्कर्ष लक्षणीय आहेत :

"या लेखांतील नावे आणि अंक यांची भाषा वेदांच्या भाषेसारखी आहे. त्यावरून इंडो-आर्यन संस्कृती वेदकालानंतर भारताबाहेर मेसोपोटेमियात पोहोचली होती, असे म्हणता येईल."

इतका स्पष्ट विश्वसनीय पुरावा असला तरी, घर्शमन, हर्माटा इत्यादि विद्वान जुन्या मताला कवटाळून बसतात आणि पळवाट काढण्यासाठी इंडो-इराणी हे इंडो-आर्यन लोकांपासून इ.पू. ४००० पूर्वीच वेगळे झाले होते असे प्रतिपादन करतात. परंतु असे विधान करताना ऋग्वेदाची भाषा इंडो-इराणीच्या पूर्वीची आहे आणि त्यामुळे इराणी लोक इराणमध्ये येण्यापूर्वी भारतात होते हे त्यांना मान्य करावे लागते.

मिटानी लोकांची भाषा वेगळी असली तरी त्यांची नावे इंडो-आर्यन आहेत आणि त्यावरून राज्यकर्ते इंडो-आर्यन होते, त्यांचे मूलस्थान भारतात होते, परक्या देशात त्यांनी राज्य केले. त्यामुळे त्यांची भाषा वेगळी होती. ॲनाटोलियात त्यांनी तेथील स्थानिक भाषा आणि संस्कृती अंगीकारली, परंतु त्यांच्या देवतांची नावे मूळ होती ती बदलणे शक्य नव्हते. हिटाईटनासुद्धा त्यांच्या भाषेत 'हट्टी' किंवा 'खट्टी' म्हणतात. कोसंबींच्या मते हे 'क्षत्रिय' (संस्कृत) किंवा 'खत्तीय'चे (पाली) रूप असावे. तेव्हा हिटाईट हे सुद्धा भारतातून बाहेर स्थलांतर केलेले आर्य असावेत आणि तसे असल्यास ते सिंधु संस्कृतीचे लोक असावेत असे म्हणणे सयुक्तिक होईल, मिटानी कलेत वशिंडाचा भारतीय बैल आहे याचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे.

प्रसिद्ध फिनीश संस्कृत पंडित **आस्को पारपोला** यांच्या मते आर्यांनी असुरांचा पराभव केल्यानंतर त्यांनी वरुण देवतेचा स्वीकार केला. त्यामुळे दाससुद्धा इंद्राचे उपासक बनले. त्यावरून मिटानी हे आर्य असून ते आर्य आणि दास यांच्या संकरातून निर्माण झाले असावेत असे म्हणता येईल. हे इ.पू. १५५० च्या सुमारास घडून आले असावे. त्यांच्या भाषेतील काही शब्द संस्कृत आहेत असे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. उदा. वशनश' (सं. वसन, वस्त्र), पादै (पद, पाय), कुपश (कूप, खड्डा) इत्यादी. '

बोघाजकोई कोरीव लेखात 'अखियवस' आणि 'अयबल' नावाच्या जमातींचा उल्लेख आहे. ते प्राचीन ग्रीक साहित्यातील अनुक्रमे 'अकेअन्स' आणि 'ओओलियन्स' असावेत असे ग्रीक इतिहासकारांना वाटते. इ.पू. १५०० च्या सुमारास इंडो-युरोपीय भाषा बोलणारे लोक ग्रीसमध्ये आले. त्यांनी घोडा ग्रीसमध्ये प्रथम आणला. ते बहुधा ॲनाटोलियामधून आले असण्याची शक्यता आहे.

**इजिप्त**

कॅसाईट लोकांनी जसा मेसोपोटेमियात घोडा आणला तसा हिक्सॉस लोकांनी इजिप्तमध्ये नेला. त्यांच्याजवळ रथही होता. इ.पू. १७७५-१६७५ या काळात त्यांनी इजिप्तवर राज्य केले. त्यांची नावे इंडो-आर्यन आहेत. उदा. 'अपच्नन' (अपघ्नन्), 'कोंस' (कर्ता) इत्यादि. टेल अमार्ना येथील पत्रव्यवहारात आणखी काही नावे आहेत. ती इ.पू. १३८०-१३५० या काळातील म्हणजे बोघाजकोईच्या लेखाच्या काळातील आहेत. ती स्पष्ट इंडो-आर्यन आहेत. उदा. अर्तमन्य, अर्झवीय, बिरीदस्व, इदरुत, सतीय, सुबंदु, सुमित्त, सुवर्ण, सुतरदत वगैरे. अर्तमन्य (सं. ऋतुमन्य, म्हणजे सत्यप्रिय), अर्झवीय (आर्जव, प्रामाणिक), बिरीदास्व (बृहदाश्व), बिरीदीय (बृहत्), इदरुत (इंद्राचा लाडका), सतीय (सत्य), सुबंदु (सुबंधु), सुमित्त (सुमित्र), सुतर्ण (शक्तिमान), सुवरदत (स्वरदत्त), यशदत इ. या शिवाय आणखी काही नावे आहेत :

१. अर्तसुमर - सं. ऋतस्मर

२. अर्तदम सं. ऋतधमन्

३. अभिरत्त- अभिरथ

४. नाम्यवज- नाम्यवज (ज्याला मोठे बक्षीस दिले आहे असा).

ही सर्व नामे इंडो-आर्यन (संस्कृत) हे उघड आहे. सुप्रसिद्ध इजिप्त इतिहासकार ए. एच. साईस म्हणतात : "टेल अमार्ना पत्रव्यवहारांत आलेली आणि हिटाईट लेखातील ही नावे भारतीयांची आहेत, यात शंका नाही. त्याचा अर्थ पश्चिम आशियात इ.पू. पंधराव्या शतकापूर्वी संस्कृत भाषा बोलली जात असावी."

इजिप्तमधील लेखांत आणखीही काही नावे आहेत. ही सर्व मंडळी इजिप्तच्या राज्यकारभारातील महत्त्वाचे अधिकारी होते. राज्यपाल, सेनापती अशा मोठ्या पदावर ती होती. याहून महत्त्वाचे म्हणजे तिसऱ्या रामसेस या इजिप्तच्या फरोहाशी (इ.पू. १२००) लढणाऱ्या चार जमातींची नावे लेखात आढळतात. शेकेलेश, एकवेश, तेरेश आणि वेशेश अशी त्यांची नावे आहेत. या जमाती ऋग्वेदातील अनुक्रमे सियु (ग्रीक सिकेलोस), एकवेश म्हणजे ग्रीक अकेअन्स आणि तेरेश- वेशेश म्हणजे वैदिक तुर्वश असावेत असे विद्वानांचे मत आहे. या जमाती मूळ भारतातील असून दाशराज्ञ युद्धात पराभव झाल्यामुळे परागंदा झाल्या आणि त्यांनी भारताबाहेर स्थलांतर केले. इ.पू.

१२०० च्या सुमारास त्या इजिप्त आणि ग्रीसमध्ये पोहोचल्या. या शिवाय आणखीही जमाती आहेत. त्या इ.पू. १२२९ मध्ये इजिप्तचा फरोहा (राजा) दुसरा रामसेस याच्याबरोबर लिबियाशी लढल्या आणि त्यांनी त्यांचा पराभव केला. अखयवस, रुकु, तुरुश, सकर्श आणि सर्देन अशी त्यांची नावे आहेत. प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांच्या मते त्यांपैकी अखयवस म्हणजे यक्षु, सकर्श म्हणजे सियु आणि तुरुश म्हणजे तुर्वश या वैदिक जमाती होत.

वरील पुराव्यावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही की, इ.पू. दुसऱ्या सहस्रकात पश्चिम आशियात इंडो-आर्यन भाषा (संस्कृत) बोलणारे लोक होते आणि तेथील राज्यकारभारात त्यांना महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्याजवळ रथ आणि घोडे होते. त्यामुळे तेथे ते थोड्या काळात प्रबळ झाले. तेथील राजदरबारात त्यांना मानाचे स्थान मिळाले. भारतीय परंपरेचा पुरावा या निष्कर्षाला पुष्टी देतो, हे पार्जिटर यांनी दाखवून दिले आहे.

**मोर**

पश्चिम आशियात आणखी एक महत्त्वाचा पुरावा अलीकडे उपलब्ध झाला आहे. तेथे खापरांवर काही वेळा मोराचे चित्र रंगवलेले दिसते. सिंधु संस्कृतीच्या खापरावर आणि त्याही आधीच्या काळात मोराचे चित्र आढळते. मोराची मातीची चित्रे हडप्पा, मोहोंजोदारो येथे सापडली आहेत. शिवाय मोर आपल्याकडून त्यांच्याकडे निर्यात होत असल्याचा लेखी पुरावा आहे. मोराची सर्वोत्कृष्ट, अत्यंत कलापूर्ण चित्रे हडप्पाच्या 'एच्' दफनभूमीतील भाड्यांवर काढलेली होती. मोराची चित्रे सर्वप्रथम नुझी (तुर्कस्तान) येथील मुद्रांवर आढळून येतात. ती मिटानी काळातील (इ.पू. १६००) आहेत. त्यानंतर एलाम (इराण), मेगिडो (इजिप्त) येथे आणि इतर स्थळीही आढळतात. परंतु इ.पू. १८०० पासून पश्चिम आशियात मोराबरोबर इंडो-आर्यन भाषा बोलणाऱ्या लोकांचेही आगमन झालेले आढळून आले आहे. उत्तर सिंधुच्या अखेरच्या काळात लोकांनी तिकडे स्थलांतर केले असावे असा याचा स्पष्ट अर्थ आहे.

इतका विश्वसनीय पुरावा असूनसुद्धा हे इंडो-आर्यन लोक भारतातून आले असावेत असे पाश्चात्त्य विद्वानांना पटत नाही. ते ॲनाटोलियातून आले असावेत असे त्यांना वाटते, म्हणजे मग आर्य तेथून भारतात आले असे म्हणायला मोकळे; तरीपण केंब्रिज विद्यापीठातील बरो या संस्कृत पंडिताने एक पळवाट ठेवली आहे. ते म्हणतात. ९१ "हा निष्कर्ष चुकीचा आहे असे म्हणावयाचे असल्यास आर्य भारतातून खूप पूर्वी भारताबाहेर गेले आणि नंतर पुन्हा भारतात आले हे सिद्ध करावे लागेल. तेव्हा हा निष्कर्ष त्याज्य आहे... आर्य भारतात इतक्या पूर्वी नव्हते तेव्हा त्या लोकांना इंडो-आर्यन म्हणण्यात काय हशील आहे!" परंतु पुढे ते असेही म्हणतात की, "आर्य भाषा आणि धर्म पश्चिम आशियात आधी (म्हणजे इ.पू. १५०० च्या आधी) असल्याच्या खुणा आहेत. तेव्हा त्या लोकांना प्रोटो-इंडो-आर्यन म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. याचा अर्थ इतकाच की आर्य भारतात बाहेरून इ.पू. १२०० च्या सुमारास आले." पुरावा विरुद्ध असला म्हणजे पाश्चात्त्य विद्वान कशा कोलांट्या उड्या मारतात याचे हे उत्तम उदाहरण आहे.

**ऑक्सस संस्कृती (*BMAC*)**

ऑस्को पारपोला यांनी 'ऑक्सस संस्कृती' (किंवा *BMAC*) ही वैदिक आर्यांची संस्कृती होती असे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. तिचे दोन कालखंड पडतातः १) इ.पू. १९००-१७००, २) इ.पू. १७००-१५००. परंतु ही भरभराटीस आलेली नागरी संस्कृती होती. तेथेही घोडा नव्हता. (फक्त एका खापरावर घोड्यासारख्या प्राण्याचे चित्र आहे). उलट ऋग्वेदात प्रतिबिंबित झालेली संस्कृती ग्रामीण आहे. 'ऑक्सस संस्कृती'च्या काही स्थळी इफ्रेड्रा वनस्पतीचे अवशेष सापडले आहेत. त्यापासून सोमरस तयार करीत असावेत असे पारपोला म्हणतात. पण काही विद्वानांना ती वनस्पती इफ्रेड्रा नाही असे वाटते. तेथे टोगोलोक-२१ आणि दशली-३ येथे गोलाकार तटबंदीयुक्त शहरे होती. ती दासांची पुरे होती असे पारपोला म्हणतात. दास हे इराणी कोरीव लेखातील दाह. परंतु दासांची तटबंदीयुक्त पुरे होती, आर्यांची नव्हती. तेव्हा 'ऑक्सस संस्कृती' ही ऋग्वेदातील आर्यांची नव्हे हे उघड आहे. सिंधुकालीन अवशेष मात्र तेथे इ.पू. २००० च्या कालखंडात सापडतात. त्यावरून इंडो-आर्यन तेथे असल्याचे सिद्ध होते. अफगाणिस्तानात शोर्टुगाय येथे सिंधु संस्कृतीची वसाहत होती आणि मध्य आशियात नमाझगा येथेही सिंधु संस्कृतीचे अवशेष सापडतात. शिवाय ज्यावेळी सिंधुचा ऱ्हास सुरू झाला, जवळपास त्याच वेळी 'ऑक्सस'लाही अवकळा प्राप्त झाली. प्रतिकूल पर्यावरणामुळे हे घडून आले.

**यूरोप**

आर्य ग्रीसपर्यंत पोहोचल्याचा वर उल्लेख केला आहे. लाटव्हिया या बाल्टिक राष्ट्रात तेथील लोक मूळ गंगेच्या खोऱ्यातील रहिवासी होते आणि कालांतराने त्यांचे तेथे
स्थलांतर झाले. रशियन आणि जर्मन लोकांतही ही समजूत आहे असे डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांनी दाखवून दिले आहे. त्यांचा पुरावा भाषाशास्त्रीय आहे.

**भारतातील स्थलांतरे**

प्रतिकूल पर्यावरणामुळे सिंधु संस्कृतीच्या लोकांनी भारताबाहेर स्थलांतर केले हे आपण पाहिले. परंतु भारतातही इतरत्र ते पसरलेल्याचा उत्तम पुरातत्त्वीय पुरावा उपलब्ध आहे. इ.पू. दुसऱ्या सहस्रकात साऱ्या भारतभर ज्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृती उदयास आल्या त्यांच्या मागे सिंधु संस्कृतीची प्रेरणा आहे.

**कायथा संस्कृती**

सिंधु संस्कृतीच्या ऱ्हासास सुरुवात झाल्यानंतर ते लोक भारतात इतर प्रदेशांत जाऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय पुरातत्त्वज्ञांनी मोठ्या प्रमाणावर अन्वेषण करून अनेक ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींचा शोध लावला आहे. या बहुसंख्य संस्कृती इ.पू. दुसऱ्या सहस्रकातील आहेत व काही थोड्या त्या आधीच्या आहेत.

'कायथा संस्कृती' (इ.पू. २४५०-२०००) ही नागरी सिंधुच्या समकालीन म्हणावी लागेल. शेजारच्या राजस्थानातून सिंधु संस्कृतीचे लोण मध्य प्रदेशाच्या माळव्यात येऊन पोहोचले. कायथा (जि. उज्जैन) येथे या संस्कृतीचे अवशेष सर्वप्रथम सापडले म्हणून तिला कायथा संस्कृती हे नाव दिले गेले. प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ (कै.) डॉ. वाकणकर यांनी या स्थळाचा शोध लावला. शिवाय आसपासच्या प्रदेशांत त्यांनी या संस्कृतीची पन्नासहून अधिक स्थळे शोधून काढली. कायथा हे प्राचीन कापिथ्थक, प्रसिद्ध ज्योतिषी वराहमिहिराचे जन्मस्थान. या संस्कृतीच्या खापरांचे सिंधु खापरांशी लक्षणीय साम्य आहे. तसेच अकीक, गोमेद, स्फटिक इत्यादी मौल्यवान दगडांचे मणी, हे हुबेहूब मोहोंजोदारो येथील मण्यांसारखे आहेत. स्टिएटाईटच्या हजारो मण्यांच्या माळाही सिंधु संस्कृतीच्या मण्यांसारख्या आहेत.

**माळवा संस्कृती (इ.पू. १७००-१४००)**

'कायथा संस्कृती'ची परिणती नंतर 'माळवा संस्कृती'त झाली असे दिसून येते. दोन्हींमधील खापरांचे साम्य लक्षात घेता तसे म्हणता येईल. 'माळवा संस्कृती'चा विस्तार माळव्यात आणि महाराष्ट्रातही झाला होता. 'माळवा संस्कृती'च्या भांड्यांची विविधता विलक्षण आहे. त्यांचे आकार, घाट, पोत आणि त्यावरील वैचित्र्यपूर्ण नक्षी भारतात इतरत्र आढळत नाही. त्यातील काही भांडी, उदा. मद्याचे चषक, काही वाडग्यांचे प्रकार, इतकेच नव्हे, तर त्यावरील नक्षी ही हुबेहूब इराणमधील ब्राँझयुगीन भांड्याप्रमाणे आहेत; परंतु कालमानाचा विचार करता ती खूप आधीची आहेत.

'माळवा संस्कृती'च्या लोकांची घरे चौकोनी आकाराची असून लांब-रुंद होती. गरीब लोक गोलाकार झोपड्यात राहत असत. बार्ली, गहू आणि इतर ध्यान्यांची ते शेती करीत. त्याच्या जोडीला पशुपालनही होते. ते देव-देवतांची पूजा करीत. नावडातोडी येथे एका मोठ्या चौकोनी (७ मी.चौ.) वास्तूमध्ये, जमीन चांगली चोपून तयार केलेली होती आणि तिच्या मध्यभागी एक चौरस आकाराचे अग्निकुंड खोदलेले होते. त्याच्या चारही बाजूस लाकडी खांब होते व आत जळके लाकडाचे तुकडे व राख होती. डॉ. सांकलियांच्या मते ते अग्निकुंड असावे. इ.पू. १४०० च्या सुमारास 'माळवा संस्कृती' लयास गेली.

**जोर्वे संस्कृती (इ.पू. १५००-९००).**

ही ताम्रपाषाणयुगीन संस्कृती महाराष्ट्रातील 'माळवा संस्कृती' मधून निर्माण झालेली होती हे खापरांवरून दिसून येते. कोकणची किनारपट्टी सोडल्यास सबंध महाराष्ट्रभर तिचा विस्तार झालेला होता. इनामगाव (जि. पुणे), दायमाबाद, नेवासे (जि. अहमदनगर) आणि प्रकाश (जि. नंदुरबार) ही या संस्कृतीची महत्त्वाची स्थळे होती. हे लोक चौकोनी झोपड्यात राहत. उत्कृष्ट घडविलेली रंगीत चित्रांची मातीची भांडी वापरीत, देव- देवतांची पूजा करीत. त्यांची एक देवता शिरोहीन होती. नंतरच्या इतिहासकाळातील शाकंभरीसारखी ती वाटते. हल्लीच्या ठाणे जिल्ह्यातील वारल्यांचीही अशी एक शिरोहीन देवता आहे. तिचे नाव पालघट. घरात लग्न निघाले म्हणजे भिंतीवर तिची चित्रे काढतात. ती

सुफलनाची देवता आहे. अशा शिरोहीन देवतेच्या मूर्ती सिंधु संस्कृतीच्या स्थळीही सापडतात. महाराष्ट्रात सिंधु लोक या आधीच पोहोचले होते याचा पुरावा दायमाबाद (जि. अहमदनगर) येथील उत्खननात मिळाला आहे.

**प्रभास संस्कृती (इ.पू. २०००-१४००)**

इ.पू. २००० पासून पर्यावरणात झपाट्याने बदल घडून येऊन ते प्रतिकूल होऊ लागले आणि त्याच्या जोडीला सरस्वती आटू लागली होती. त्यामुळे सिंधु लोकांची स्थलांतरे सुरू झाली. आधी ते सौराष्ट्रात आणि कच्छमध्ये होतेच. त्यांचीही अवनती सुरू झाली. तेथे प्रभास (जि. जुनागढ) आणि रंगपूर (जि. लिंबडी) या दोन संस्कृती उदयास आल्या. प्रभास संस्कृतीच्या खापरावरील सिंधु प्रभाव सहज ओळखता येतो. तेच घाट आणि तीच नक्षी. त्यामुळे 'प्रभास संस्कृती'ला उत्तर सिंधु म्हणणे चुकीचे ठरणार नाही. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे खुद्द प्रभास येथे उत्खननात एक स्टिएटाईटची मुद्रा सापडली. ती सिंधु मुद्रेसारखी आहे. फक्त तिच्यावर सिंधु लिपीत लेख नाही. तेथे एक ऑब्सिडियन या दगडाचे धारदार पातेही सापडले. हा दगड पश्चिम आशियात सापडतो. तेथून ते आले असावे.

**रंगपूर संस्कृती (इ.पू. १८००-१२००)**

'प्रभास संस्कृती'ची व्याप्ती सौराष्ट्राच्या दक्षिण भागात होती, तर उत्तरेकडे 'रंगपूर संस्कृती' होती. या संस्कृतीची खापरे अत्युत्कृष्ट आहेत. त्यांच्या एक प्रकारची छिलई
असते, म्हणून त्यांना (*Lustrous Red Ware)* असे नाव दिले गेले. रंगपूर येथे आधी सिंधु संस्कृतीचे अवशेष सापडतात. तिच्या हासकाळात 'रंगपूर संस्कृती'ची उत्पत्ती झाली. रंगपूर (जि. अहमदाबाद, गुजरात) येथेही एक स्टिएटाईटची मुद्रा सापडली. तिच्यावरही लेख नाही. रंगपूरची मातीची रंगीत भांडी आणि उत्तर सिंधु (सिमिटरी एच्) यांच्यात विलक्षण साम्य आहे.

पश्चिम गुजरातच्या किनारपट्टीच्या प्रदेशात नागरी सिंधु पोहोचली नव्हती, परंतु उत्तर सिंधु काळात तेथेही वस्ती झाली. तापीच्या खोऱ्यातून हे उत्तर सिंधुचे लोण महाराष्ट्रात आले. गुजरातमधील कच्छचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. भुज्जू नावाच्या राजावरून भूज नाव पडले असावे, असे विद्वानांचे मत आहे.

**उत्तर भारत- गंगेचे खोरे**

सिंधु संस्कृतीचा प्रभाव गंगेच्या खोऱ्यातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीवर पडला होता याचा पुरावा आता मिळू लागला आहे. गंगेच्या खोऱ्यात अनेक ठिकाणी विशिष्ट तांबड्या रंगाची खापरे सापडतात. तेथे सापडणाऱ्या ताम्रनिधींशी त्यांचा संबंध जोडला जातो. या खापरांच्या ओसीपी (ओकर कलर्ड पॉटरी) असा उल्लेख पुरातत्त्वज्ञ करतात. आलमगीरपूर, बारगाव, आंबखेडी इत्यादी स्थळांच्या उत्खननातील पुराव्यावरुन असे दिसून येते की, ही खापरे सिंधु खापरांपासून पुढे निर्माण झालेली आहेत. त्यांचे काही घाट आणि काही ठिकाणी त्यावर दिसणारी नक्षी यावरून हे सिद्ध झाले आहे. काही वर्षांपूर्वी अलाहाबाद विद्यापीठाचे पुरातत्त्वज्ञ गोरधनराय शर्मा यांनी कौशांबी येथे सर्वात खालच्या थरात सापडलेली रंगीत खापरे आणि अंचदीह आणि काकोरिया या ठिकाणी मिळालेली खापरे यावर सिंधु खापरांचा प्रभाव आढळून येतो, असे मत व्यक्त केले होते. त्यावेळी यांच्याशी कोणीही सहमत नव्हते. परंतु आता तो असण्याची शक्यता बिहारमध्ये उजेडात आलेल्या पुराव्यावरून निर्माण झाली आहे.

इ.पू. २२०० पासून सिंधु संस्कृती ऱ्हास सुरू झाल्यामुळे स्थलांतरे सुरू झाली. त्यातील काही लोक गंगेच्या खोऱ्यात आले असावेत. ऋग्वेदात गंगेचा उल्लेख, एकदा का होईना, पण आहे. इतकेच नव्हे, तर एका काशीराजाचा उल्लेखही आहे. बिहारमध्ये ते नक्कीच आले असावेत. तेथे त्यांनी वसाहती स्थापन केल्या. बिहार तसा तांदळाचा प्रदेश पण तेथे त्यांनी बार्ली आणि गव्हाची शेती केली. तेथील घरातून तंदूर सापडले आहेत. ते सिंधु लोकांचे वैशिष्ट्य होते. मातीच्या भांड्यातही साम्य आहे. एका हाडाचा कोनमापक एका ठिकाणी मिळाला. कालीबंगन आणि बनावली येथेही त्याच प्रकारचे कोनमापक मिळाले आहेत, हे या संदर्भात नमूद केले पाहिजे. ऋग्वेदात दक्षिण बिहारमधील किकट नावाच्या एका जमातींचा उल्लेख आहे. त्यावरून सिंधु लोक/आर्य बिहारपर्यंत जाऊन पोहोचले होते हे स्पष्ट होते; परंतु तेथील आदिवासींची चिन्हे म्हणजे सिंधु लिपी आहे असे काही विद्वानांना वाटते, ते पटणारे नाही.

गंगेच्या खोऱ्यात आर्य जाऊन पोहोचले होते याचा विश्वसनीय पुरावा वैदिक वाङ्मयात आहे. शतपथ ब्राह्मणात विदेघ माथवाची कथा आहे. तो तोंडात अग्नी (अग्नि वैश्वानर) घेऊन सरस्वतीच्या तीरावरून, त्याचा पुरोहित गोतम रघुगण, याच्यासह गंगेच्या खोऱ्यात आला आणि सदानीरा नदीपर्यंत (बिहारमधील सध्याची गंडक) जाऊन पोहोचला. अग्नीने जंगल जाळून जमीन लागवडीसाठी उपलब्ध करून दिली. अशा प्रकारे आर्यांना तो प्रदेश वसाहतीसाठी उपलब्ध झाला. बौधायन श्रोतसूत्रातही आर्य सप्तसिंधुच्या प्रदेशातून पूर्वेकडे गेल्याचा उल्लेख आहे. त्यात 'आयु पूर्वेकडे गेला' याचा त्यांचा स्पष्ट निर्देश आहे.